# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | दहावे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३८**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष अकरावे / अंक ३ / फेब्रुवारी २००१

## संपादकीय
## माहिती उपलब्धतेच्या दिशेने

मानवी विकासाच्या प्रक्रियेमध्ये विविध कालखंडांना त्याच्या विविध वैशिष्ट्यांमुळे महत्त्व प्राप्त झालेले दिसते. या विकास प्रक्रियेतील गेल्या ३० - ४० वर्षांच कालखंड हा माहिती या घटकाला आलेल्या अनन्यसाधारण महत्त्वामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. त्यामुळेच आजच्या काळाचे वर्णन 'माहितीचे युग' असे करण्यात येते. 'माहिती' ही संकल्पना फार व्यापक आहे. कोणत्याही गोष्टीचा तपशील म्हणजे माहिती. माहिती इतकी प्रचंड आहे की, ती एका आयुष्यात आकलन करणे दुरापास्त व अनावश्यक आहे. म्हणून विविध टप्प्यांवर आपल्या सामाजिक, सांस्कृतिक भूमिकांत आवश्यक असेल ती माहिती विनासायास, सुलभतेने मिळणे आवश्यक असते.


माहितीचे संक्रमण होणे याला मोठा इतिहास आहे. या संक्रमणाच्या पद्धतीत पारंपरिकरीत्या रूढ असणाऱ्या मौखिक व छापील किंवा मुद्रित या पद्धती महत्त्वाच्या ठरल्या. मानवी इतिहासात चार पाच हजार वर्षांपासून प्रचलित असणारी मौखिक पद्धती सर्वज्ञात आहे. एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे माहितीचे संक्रमण करण्याच्या या परंपरेत भारताचे योगदान मोठे आहे. माहिती संक्रमणासाठी मुद्रित पद्धतीचा वापर करण्यात युरोपचे प्राबल्य दिसून येते. मुद्रण तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांसह इतर सर्व क्षेत्रात क्रांती घडून आली. त्यामुळे या विकासात त्यांचे योगदान आहे.

संक्रमित होणारी माहिती ही अचूक व विश्वासार्ह असणे हे महत्त्वाचे आहे. चुकीची माहिती समाजाला, सामाजिक विकासाला कर्करोगासारखी घातक असते. मानवी कल्पनाशक्तीतून माहितीचे संक्रमण करण्याच्या दृष्टीने कायमच नवीन माध्यमे विकसित झाली व आजही होत आहेत. माहितीचा पहिला स्त्रोत घर व शाळा असला तरी, व्याप्ती वाढत जाते तशी स्त्रोत संख्या, स्वरूपही बदलत जाते.


माहिती निर्मिती, संक्रमण या प्रक्रियांना गेल्या शतकात १९८० नंतर संगणक विज्ञानाची जी उपलब्धता झाली तिने एक क्रांतिकारी वळण दिले. एकाच वेळी असंख्यात महितीची साठवणूक, संक्रमण, अनेकांपर्यंत पोहचण्याची शक्यता संगणकामुळे निर्माण झाली. पण संगणक व नागरिक यांतील दरीही मोठी आहे, ती दूर होत नाही. शिवाय या माध्यमातून होणारा माहितीचा प्रसार हा देखील एक वेगळा शाखा विषय बनला आहे. संगणकाधारित माहितीच्या उपलब्धतेत आंतरजालाची भर पडल्याने आज माहितीचा महामार्ग निर्माण झाला. पण अत्यंत माफक दरात, योग्य, सुटसुटीतपणे ही

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,
दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा




वर्ष अकरावे / अंक २ / फेब्रुवारी २००९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ८ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | दिशा सूची २००८ | श्री. सचिन गराटे | ३ |
| २) | आयुष्यात कायम आठवणीत राहिलेली घटना | श्री. मा. ना. पाटील | ७ |
| ३) | संक्रांत - एक व्रत | सौ. उषा कळमकर | ९ |
| ४) | ऊरूमची शहरातील लाल टेकडी | डॉ. सुधाकर आगरकर | ११ |
| ५) | गीता आणि दैनंदिन जीवन : लेखांक तिसरा | श्री. शं. बा. मठ | १४ |
| ६) | भारतीय संस्कृती -बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १७ |
| ७) | निखळलेले तारे | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | २३ |
| ८) | स्वार्थ | श्री. यशवंत माने | २८ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''**विद्या प्रसारक मंडळ A/c** दिशा'' या नावाने पाठवावा.

# 'दिशा' सूची २००८
## (वर्ष ९)

*२००८ सालातील दिशामधील लेखाची सूची येथे देत आहोत. दिशाचा संदर्भासाठी वापर करणाऱ्यांना या सूचीचा नक्कीच लाभ होईल. दिशाचे जुने वाचक व ग्रंथालयात कार्यरत असणारे श्री. सचिन गराटे यांनी आमच्या विनंतीस मान देऊन ही सूची बनवली आहे. दिशातर्फे त्यांचे आभार! - संपादक*


| क्र. | लेखक | लेखाचे नाव | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|
| १ | | ० डॉ. बेडेकर विद्या मंदिराची समर्थ धुरा! (परिचय) | नोव्हें. | २६-२७ |
| २ | अरदकर, प्रभाकर द. | ० वार्धक्य - शाप की वरदान | फेब्रु. | ३०-३१ |
| ३ | | ० पालकांच्या अपेक्षांचे ओझे | मार्च | २९-३० |
| ४ | | ० एस्. एस्. सी. परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन | नोव्हें. | २०-२३ |
| ५ | आगरकर, सुधाकर | ० कुनमिंगची पश्चिम टेकडी : भाविकांचे भक्तिस्थान | जाने. | ११-१३ |
| ६ | | ० चीनच्या कुनमिंग शहरातील सूवर्णमंदिर | मार्च | ३-५ |
| ७ | | ० चीनमधील विज्ञान प्रदर्शनात ठाण्याच्या विद्यार्थ्यांचे यश | सप्टें. | २६-२७ |
| ८ | | ० ऊरूम्ची: वाळवंटातील नंदनवन | डिसे. | ११-१३ |
| ९ | आठल्ये, श्रीनिवास | ० निखळलेले तारे | फेब्रु. | ३-१० |
| १० | | ० मराठी वर्णक्रम नियमावली | डिसें. | २४-३१ |
| ११ | कर्णिक, प्रदीप | ० दामले सर | एप्रिल | ३१-३४ |
| १२ | | ० ग्रंथसामर्थ्य | ऑग. | ३-१० |
| १३ | | ० परंपरा आणि शैक्षणिक नवप्रणालीचा सुरेख संगम श्री ज्ञानदेव वाङ्मय चर्चासत्र | सप्टें. | ३-५ |
| १४ | करंदीकर, श्री. वि. | ० २५ वर्षांची गौरवशाली वाटचाल - एक सिंहावलोकन (विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन) | ऑग. | ११-१४ |
| १५ | कळमकर, उषा जयंत | ० व्यक्तिमत्त्व विकास काळाची गरज | सप्टें. | २२-२४ |
| १६ | कुवर, मोनिका दि. | ० मृत्यू | मे | २९-३० |
| १७ | | ० पाप - पुण्य | सप्टें. | २५ |
| १८ | कुलकर्णी, प्रिती | ० एक दिवसः आजी - आजोबांचा | एप्रिल | ३-५ |
| १९ | | ० खरा शिक्षक दिन | ऑक्टो. | २८-२९,३१ |
| २० | कुलकर्णी, प्रिती व वरूडकर, अपर्णा | ० इंग्रजी बालशाळेतील भाषा विकासाचा कार्यक्रम - शिक्षकांचा दृष्टिकोन | जाने. | २४-३१ |
| २१ | खरे, सुनीता जयंत | ० सफर कुबेरनगरीची | मे | ३१-३४ |
| २२ | | ० युरोपची तोंड ओळख | ऑक्टो. | ८-११, १९ |
| २३ | | ० युरोपची तोंड ओळख | नोव्हे | १२-१९,२३ |
| २४ | गराटे, सचिन | ० दिशा : सूची २००७ | फेब्रु. | ११-१३ |
| २५ | | ० अक्षरवेल : देखणा उपक्रम | मार्च | ६-७ |


जे बद्ध आहेत, त्यांना मुक्त करणे हे गुरूचे काम - साने गुरूजी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | गोखले, स्वाती | ◦ महाराष्ट्र बालशिक्षण परिषद १४ वे राज्यस्तरीय अधिवेशन वृत्तांत : २००७ - २००८ | जाने. | २०-२३ |
| २७ | देवधर, मालती | ◦ मकरसंक्रांत | जाने. | ६ |
| २८ | धारवाडकर, निर्मला | ◦ इस्पितळाचा पहिलाच अनुभव | ऑग. | २०-२१ |
| २९ | पराडकर, मो. दि. | ◦ भारतीय तत्वज्ञानाची वैशिष्ट्ये | फेब्रु. | ३२-३४ |
| ३० | पाठक, मोहन | ◦ देव्यापराध क्षमापन स्त्रोत्र (पद्यानुवाद) | जाने. | ३९ |
| ३१ | | ◦ न मागितलेली भीक, मागे लागलेले कुत्रे | ऑक्टो. | २१-२२ |
| ३२ | | ◦ एका कर्मयोग्याचे प्रकट चिंतन | नोव्हें. | ३७-३८ |
| ३३ | भिडे, आशा | ◦ जगावेगळा याचक | मार्च | ८-११ |
| ३४ | | ◦ जगद्‌गुरू श्री शंकराचार्यांची दोन स्तोत्रे | मे | ३-६ |
| ३५ | | ◦ सुनोजी, ये कलकत्ता है | जून | ३-७ |
| ३६ | | ◦ ग्रंथवेडा, ग्रंथपाल श्री नारायण काळे | जुलै | १२-१५ |
| ३७ | | ◦ तुकारामांच्या अभंगातील नाममहिमा | सप्टें. | ६-१० |
| ३८ | | ◦ वासांसि जिर्णानि यथा विहाय | डिसे. | ७-१०, १३ |
| ३९ | मठ, शं. बा. | ◦ अरुणाचलम् येथील रमण महर्षी - १ | जाने. | ७-१० |
| ४० | | ◦ अरुणाचलम् येथील रमण महर्षी - २ | फेब्रु. | २६-२९ |
| ४१ | | ◦ संत चोखामेळा (पूर्वार्ध) | मार्च | १५-१८ |
| ४२ | | ◦ श्री संत चोखामेळा (लेखांक २) | एप्रि. | १९-२२ |
| ४३ | | ◦ श्रीसंत नरहरी सोनार | मे | १६-२१ |
| ४४ | | ◦ श्री संत सावतामाळी | जून | २४-२७ |
| ४५ | | ◦ सच्चिदानंद बाबा | जुलै | ३-७ |
| ४६ | | ◦ संतसेना महाराज चरित्र - १ | ऑग. | २२-२५ |
| ४७ | | ◦ संतसेना महाराज चरित्र - २ | सप्टें. | ११-१४ |
| ४८ | | ◦ श्री संत निळोबाराय | ऑक्टो. | ३-७ |
| ४९ | | ◦ संत श्रेष्ठ बहिणाबाई | नोव्हें. | ३-८ |
| ५० | | ◦ गीता आणि दैनंदिन जीवन | डिसें. | ३-६ |
| ५१ | माने, यशवंत | ◦ देव देहीच पहावा | ऑग. | ३२-३४ |
| ५२ | | ◦ भाव | सप्टें. | २८-२९ |
| ५३ | | ◦ शाश्वत आनंद | ऑक्टो. | २०, २२ |
| ५४ | | ◦ घर एक मंदिर | नोव्हें. | २४-२५ |
| ५५ | | ◦ शुद्ध भाव | डिसे. | १४ |
| ५६ | रसाळ, रोहिणी | ◦ शिक्षण पत्रिकेच्या नजरेतून शिक्षक | एप्रि. | ६-१८ |
| ५७ | लागू, सुरेंद्र चिं. | ◦ ठाण्याची ब्राह्मण सभा | मे | १२-१५ |
| ५८ | | ◦ ग्रंथ प्रकाशन सोहळा | जुलै | ८-११ |
| ५९ | | ◦ वामनराव मराठे - स्थितप्रज्ञ कार्यकर्ता | ऑक्टो. | २३-२५,३८ |
| ६० | शेंड्ये, विश्वनाथ | ◦ एक झपाटलेला झुंजार इतिहासतज्ज्ञ हरपला | जाने. | ३-५ |
| ६१ | शेवडे, मैत्रैयी | ◦ श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा - २००८ | ऑक्टो. | ३०-३१ |

सर्व काही गेल्यावर आपल्याजवळ उरते, त्याला अनुभव म्हणतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६२ | साठे, पूर्णिमा | ० गणिताचे अध्यापन | जून | ११-२३ |
| ६३ | साने, यशवंत | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | जाने. | १४-१९,४० |
| ६४ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | फेब्रु. | १४-२५ |
| ६५ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | मार्च | १९-२८ |
| ६६ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | एप्रि. | २३-३० |
| ६७ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | मे | २२-२८ |
| ६८ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | जून | २८-३५ |
| ६९ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | जुलै | १६-२६ |
| ७० | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | ऑग. | १५-१९ |
| ७१ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | सप्टें. | १५-१८ |
| ७२ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | ऑक्टो. | १२-१७ |
| ७३ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | नोव्हें. | ९-११, २७ |
| ७४ | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | डिसे. | १९-२३ |
| ७५ | सिंगवी, पुनम | ० बदलता भूगोल, वाढते शहरीकरण आणि ढासळते पर्यावरण | मार्च | १२-१४ |
| ७६ | | ० देखण्या निसर्गाचा आविस्मरणीय अविष्कार अंदमान निकोबार बेटांचा समूह | मे | ७-११ |
| ७७ | | ० पासष्टीतील अभिव्यक्ती | जुलै | २७-३२ |
| ७८ | | ० समस्यामुक्त समाजव्यवस्था | ऑक्टो. | १८-१९ |
| ७९ | हजारे, अनिल | ० गोवा सहलीचा बेत | ऑग. | २६-२७ |
| ८० | हब्बु, वेदवती | ० मोबाईल वापर की गैरवापर | ऑक्टो. | २६-२७ |


**तक्ता - १ (संपादकीय)**


| संपादकीय २००८ | महिना |
|---|---|
| आर्थिक मंदी व समाज | डिसेंबर |
| क्रियेवीण वाचाळ माणसे | मे |
| तर तो सुदिन ठरेल | ऑगस्ट |
| प्रश्नांची तीव्रता वाढत आहे | जुलै |
| भाषा आणि अभिनिवेशन | नोव्हेंबर |
| भाषाभिवृद्धी आणि मनोदास्य | मार्च |
| महासत्ता नावाचे मृगजळ | जून |
| मानवी जनावर | सप्टेंबर |
| विनाशकारी खरेदी यात्रा | फेब्रुवारी |
| संत साहित्यातील ज्ञानद्वीप | एप्रिल |
| संस्कृतीच्या दिशांची दुर्दशा | ऑक्टोबर |
| सामाजभिमुख संशोधन | जानेवारी |


**तक्ता - २ (परिसर वार्ता)**


| परिसर वार्ता | पृ. क्र. |
|---|---|
| जानेवारी | ३२ - ३८ |
| फेब्रुवारी | ३६ - ४० |
| मार्च | ३३ |
| एप्रिल | ३६ - ४० |
| मे | ३५ - ३९ |
| जून | ३६ - ३८ |
| जुलै | ३३ - ४० |
| ऑगस्ट | ३५ - ३९ |
| सप्टेंबर | ३२ - ४० |
| ऑक्टोबर | ३२ - ३८ |
| नोव्हेंबर | ३२ - ३६, ३९ - ४० |
| डिसेंबर | ३२ - ४० |


सर्व प्रश्न सोडवून सुटणारे नसतात. काही प्रश्न सोडून दिले की सुटतात - विनोबा भावे

तक्ता - ३ पुस्तक परिचय

| क्र. | मूळ ग्रंथ | लेखक | प्रकाशक | परीक्षणकर्ता | परीक्षणाचे शीर्षक | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आनंदाचा झरा | अनुराधा जोशी | उद्वेली बुक्स, ठाणे | लागू, सुरेंद्र | आनंदाचा झरा | नोव्हे. | २८-३० |
| २ | ओ पी नैय्यर आणि मी | प्रल्हाद आवळसकर | प्रतीक प्रका., पुणे | पाठक, मोहन | ओ.पी. नैय्यर आणि मी | ऑग. | २८-३० |
| ३ | ग्रंथकल्याणी | - | सार्व. वाचनालय, कल्याण | जोशी, शरद | ग्रंथकल्याणी | एप्रि. | ३५ |
| ४ | चंद्रलोक | मोहन आपटे | राजहंस प्रका., पुणे | जोशी, शरद | राजहंस प्रकाशनाचा एक अपूर्व ग्रंथ | जून | १० |
| ५ | दिव्यस्पर्शी | धनंजय देशपांडे | प्रसाद प्रका., पुणे | जोशी, शरद | वाचावीत अशी पुस्तके | सप्टें. | २१ |
| ६ | मध्यरात्रीचा तो चंद्र | गजानन देशपांडे | उद्वेली बुक्स, ठाणे | जोशी, शरद | - | डिसें. | १६ |
| ७ | रातवा | चंद्रकुमार नलगे | अजय पब्लि., कोल्हापूर | जोशी, शरद | रातवा (आत्मकथन) | जून | ८-९ |
| ८ | शब्दानंद : त्रैभाषिक महाकोश | सत्वशीला सामंत | डायमंड पब्लि, पुणे | जोशी, शरद | त्रैभाषिक महाकोश शब्दानंद | डिसें. | १५-१६ |
| ९ | शिक्षणातील चांगले काही | रेणू दांडकर | प्रफुल्लता प्रका., पुणे | जोशी, शरद | वाचावीत अशी पुस्तके | सप्टें. | १९-२० |
| १० | सततची नाटके | राजीव नाईक | मौज प्रका., मुंबई | पाठक, मोहन | सार्वकालीन जाणीवांचा वेध | मार्च | ३१-३२ |
| ११ | समर्थ वाङ्मय : मनोवेधक आस्वाद | ह. श्री. परांजपे | - | पाठक, मोहन | समर्थ साहित्यासंदर्भा - तील लक्षणीय पुस्तक | फेब्रु. | ३५ |
| १२ | दि स्टेटमन्स इयर बुक २००९ | टर्नर बॅरी (संपा.) | पालग्रेव्ह मॅकमिलन | बारसे, नारायण | दि स्टेटमन्स इयरबुक २००९ | नोव्हे. | ३१, ३६ |
| १३ | स्टॉप वॉच | स्नेहल गोविलकर | जीवनरंग प्रका.,मुंबई | जोशी, शरद | वाचावीत अशी पुस्तके | सप्टें. | २०, २१ |
| १४ | श्री देवी महात्म | रामबाबा वर्णेकर | ज्योती प्रका., सातारा | भिडे, आशा | श्री देवी महात्म | डिसें. | १७ |
| १५ | श्रीमत् आद्य शंकराचार्य यांची निवडक स्तोत्रे | शं.बा. मठ | अरविंद प्रका., ठाणे | पाठक, मोहन | आद्यगुरू शंकराचार्य यांची स्तोत्रे | ऑग. | ३०-३१ |

**संकलन - श्री. सचिन गराटे,**
रूपारेल महाविद्यालय, मुंबई

●●●

# आयुष्यात कायम आठवणीत राहिलेली घटना

*आयुष्यभर आठवणीत राहणारे प्रसंग माणसाच्या जीवनात असतात. अशा काही प्रसंगांची अभिव्यक्ती आपल्या लेखनातून करता येणे हा आनंद असतो. माननीय मा. ना. पाटील यांनी शब्दांकित केलेली अशीच एक घटना - संपादक*

काळ, ब्रिटीश राजवटीचा. १९४२ च्या चलेजाव ठरावानंतरचा.

सर्वत्र ब्रिटीश राजवटीचा अंमल. देशातील स्वातंत्र्य लढ्याची चळवळ जोरात होती, महात्मा गांधीजींसह सर्व थोर पुढारी अटकेत. बहुतेक सर्व अटक केले पुढारी दिल्लीवरून मुंबईला रेल्वेने आणले जात होते. खास रेल्वे गाड्या पुढाऱ्यांना पोलीस बंदोबस्तात आणत होत्या. त्या काळात रेल्वे गाड्या मोजक्याच होत्या. सर्व गाड्या नाशिकरोड मार्गे मुंबईकडे जात होत्या. पोलीस बंदोबस्तात अधिकारी सोडून सर्व शिपाई भारतीयच होते.



नाशिक शहरापासून नाशिकरोड स्टेशन सुमारे १० कि.मी. (त्यावेळचे सहा मैल). नाशिकवासियांनी स्टेशनवर पुढाऱ्यांना बघण्यासाठी गर्दी करू नये यासाठी त्यावेळी खबरदारी म्हणून दळणवळणाच्या सोयी असलेल्या खाजगी बस गाड्या, टॅक्सी, टांगे वगैरे नाशिकच्या पोलिसांनी बंद केले होते.

आम्ही इंग्रजी इयत्ता ५ वी चे ५-६ देशप्रेमी विद्यार्थी



एके दिवशी, रात्री जेवण करून पायीच नाशिकरोडकडे निघालो. मध्यरात्रीनंतर पहाट होण्याआधी नाशिकरोडच्या स्टेशनवर आलो. त्यावेळी स्टेशन खूपच लहान होते. फक्त दोनच प्लॅटफॉर्म. एक नंबर व दोन नंबर. दोन नंबर मुंबईकडे जाण्यास व एक नंबर भुसावळ, दिल्लीकडे जाणारा.

संपूर्ण स्टेशनात लोकांची अतिशय गर्दी. नक्की दिवस व तारीख आठवत नाही. साधारणपणे मे ची अखेर किंवा जूनची सुरुवात असेल. कारण वातावरण ढगाळ होते. पहाटे उजाडल्यानंतर एक लहान खास गाडी पूज्य महात्माजी व त्यांचे सहकारी यांना घेऊन मुंबईकडे जाणार होती. गाडी २ नंबर प्लॅटफॉर्मवर आली. न आवरणारी गर्दी, महात्माजींचे दर्शन घेऊन बाजूला हटत होती. कोणी दुरून दर्शन घेई तर कुणी जवळ जाऊन महात्माजींच्या हाताला स्पर्श करीत. खादी पंचा नेसलेले व अंगावरती खादीचे उपरणे घेतलेले महात्माजी त्यावेळी जुन्या काळच्या तृतीय वर्गाच्या डब्यात बसलेले होते. गाडी फार मोठी नव्हती. ४/५ डबे असलेली. प्रत्येकाची दर्शन घेण्याची इच्छा; त्यामुळे गर्दी शिस्तीमध्ये सरकत होती. आम्ही महात्माजींचे दूर अंतरावरून दर्शन

घेतले व बाजूला सरकलो.

''महात्मा गांधी की जय! ब्रिटीशांनो चालते व्हा!'' व अशा प्रकारच्या अनेक आरोळ्यांनी स्टेशनचा परिसर दणाणून गेला होता. महात्माजींच्या गाडी मागोमाग अटक झालेल्या इतर पुढाऱ्यांना घेऊन दुसरी गाडी येणार होती. त्याची खबर मिळाल्यामुळे आम्ही तिथून मागे पळ काढला. दुसरी गाडी पाठोपाठ आलेली आहे व स्टेशनच्या अगोदरच्या सिग्नल जवळ थांबलेली आहे हे कळले व आम्ही लगेच पळत मागे आलो.

नाशिकरोड स्टेशनचा सिग्नल मूळ स्टेशनपासून सुमारे १ कि.मी. अलीकडे होता. त्याच्या दोन्ही बाजूला त्यावेळच्या गव्हर्नमेंट डिस्टीलरीच्या स्टाफ क्वार्टर्स (चाळी) होत्या. माझे एक नातेवाईक या चाळीत रहात होते. त्यांच्या घरी पोहाचलो. चाळीमधील सर्व लोक, लहान मुले, बायकांसकट रेल्वे लाईनच्या जवळ जमा झाले होते. माझ्या नातेवाईकांच्या घरी बरीच माणसे जमा झाली होती. गरम पाणी भरलेल्या बादल्या, चहा तयार केलेल्या ॲल्युमिनियमच्या किटल्या व जाड काचेच्या कपबश्या गोळा करून नुकत्याच सिग्नल जवळ येऊन उभ्या असलेल्या गाडीकडे जाण्याच्या तयारीत होते.

उभी असलेली गाडी चाळीपासून जवळच होती. सर्व मंडळी सह आम्ही रेल्वे लाईन जवळ गेलो. ह्या वेळेपर्यंत चांगले उजाडलेले होते. गाडीतून खाली उतरलेले पंडित नेहरू, दादासाहेब मावळणकर, सरदार वल्लभभाई व इतर आणखी काही व्यक्ती आपसात बोलत होती व आमचा पाहुणचार स्वीकारत होती. महात्माजी, पंडितजी व इतर सर्वांचा जयजयकार सतत चालला होता. पंडितजी व इतर व्यक्ती हात वर करून आम्हांला साथ देत होते. गाडीच्या खिडक्यांमधून दरवाजात उभे राहून काही व्यक्ती त्या एकंदर जयजयकारात सहभागी झाले होते.

बादल्यातून आणलेले गरम पाणी घेऊन पंडितजींनी व खाली उतरलेल्या अनेकांनी तोंडे धुणे, चूळ भरणे व तोंडावरून हात फिरविणे केल्यानंतर ॲल्युमिनियमच्या किटलीमधून आणलेला तयार चहा जाड काचेच्या कपबशी मधून अतिशय प्रेमाने घेतला. काही वेळा नंतर सिग्नल डाऊन झाल्यावर भक भक करीत कोळशाच्या इंजिनाची गाडी खाली उतरलेल्या सर्व शिपाई व पुढाऱ्यांना घेऊन स्टेशनकडे निघाली. मागे उरला तो फक्त जयजयकार, झिंदाबाद व भारतमाता की जय. ''ब्रिटीशांनो चालते व्हा'' इत्यादी अरोळ्यांचा माहोल. अशी होती एकंदर त्यावेळची घटना. आयुष्यभर आठवणीत रहाणारी.

**श्री. मा. ना. पाटील**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद,
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

---

## 'इटिंग द सन'

'इटिंग द सन' या नव्याने आलेल्या सौर उर्जेसंबंधी पुस्तकात (प्रकाशक हारपर कॉलिनस्) ऑलिव्हर मॉर्टन यांनी असे भाकित केले आहे की आपण ऊर्जेच्या पुनर्वापराच्या जवळ जात आहोत. यामुळे हवामान विषयक प्रश्नांवर तोडगा निघू शकेल. या पुस्तकाचा विषय असणाऱ्या प्रकाश संश्लेषण या प्रक्रियेत याचे मर्म दडले आहे. सौर ऊर्जेच सरळ रूपांतर वीजेत करणे या विषयीचे हे तंत्रज्ञान आहे. मॅनहॅटन प्रकल्प म्हणून ज्ञात असणाऱ्या दुसऱ्या महास्वुद्धातील वैज्ञानिक सहयोगातून निर्माण झालेल्या अणुबॉम्ब प्रक्रियेची कल्पना (१९४५) लेखकाच्या मनात आहे. ऊर्जानिर्मिती क्षेत्राशी संबंधित वैज्ञनिक व अभ्यासकांनी वाचायलाच हवे असे हे पुस्तक आहे.

(आंतरराष्ट्रीय ग्रंथ क्रमांक ISBN 97800071-63649)

**न्यू सायंटिस्ट, २९ नोव्हें. २००८, आधारित**

# संक्रांत एक व्रत

*संक्रांत ते रथसप्तमी हा आपल्या धर्मात पुण्यकाळ मानलेला आहे. या व्रताबद्दल आपले विचार व्यक्त करत आहेत सौ. कळमकर - संपादक*

सुखप्राप्ती आणि दु:ख निवृत्तीसाठी आचारधर्म, नीतीधर्म, संस्कार, सणवार, व्रत-वैकल्ये सांगितल्यानेच प्रत्येक वर्ष आनंदाने निघून जाते. संक्रांत हे त्यापैकीच एक व्रत. एक तीळ सात जणांत वाटून घेऊन स्नेहबंध पक्का करायचा या दृष्टीने हा सामाजिक सण.

सूर्याचे मकर संक्रमण म्हणून ही मकर संक्रांत. सूर्य हा चराचराचा, पृथ्वीचा आत्मा. त्याच्या प्रकाशावरच सृष्टीचे जीवन अवलंबून आहे. म्हणून संक्रांतीचा नि सूर्याचा संबंध आहे. आरोग्य रक्षणासाठी व रोगनिवारणासाठी सूर्यकिरणासारखे गुणकारी औषध नाही. ऋतुमानानुसार या काळात वर्षभरासाठीचा शक्तीचा व ऊर्जेचा साठा करून ठेवायचा. शरीर सशक्त व तेजस्वी बनविणाऱ्या अन्नाचा हा 'पक्वानोत्सव' म्हणजे हा सण. जसा धार्मिक तसा तो आरोग्यरक्षणाचा आहे. शरीरस्वास्थ, उत्तम प्रकृती करण्यासाठी व आपले निरोगी मन तिळाप्रमाणे स्नेहपूर्ण व वाणी गुळासारखी मधुर असावी हा तिळगुळाचा उद्देश आहे. खरं तर जीवनातही तिळ-तिळ झटल्यानेच प्रतिष्ठा प्राप्त होते. बोलणं मधुरच असावं. संत ज्ञानदेव म्हणतात -

पुढा स्नेह पाझरे। मागा चालती अक्षरे।
शब्दपाठी अवतरे। कृपा आधी॥
तैसेसाच आणि मवाळ। मितुले सरळ।
शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे॥

स्नेह म्हणजे संक्रांतीचा तीळ आणि अमृत म्हणजेच गूळ. याच्या संघटनानेच समाजबांधणी होते. स्वार्थ धुतला जाऊन विवेक विचारांच्या साहाय्याने अहंकार लयास जातो. जीवाची उन्नती, समृद्धी होते. व्यक्तीचा प्रवास समष्टीपर्यंत होतो. 'गोड बोलण्याचे' वचन सहज दिले - घेतले जाते. आत्मविकासासाठी समानता, सहृदयता यांचा पुरस्कार होतो. यादृष्टीने हा सण विकासाचा उत्सव आहे. 'गोड गोड बोला' ह्या सांकेतिक वाक्यातून अहंकाराचा बुडबुडाही फुटतो. जे असेल ते सर्वांनी विभागून घ्यावयाचे. ही संविभाग रूचिता मनामनांचा सत्त्वगुण दर्शविते. छोट्यात छोटा पदार्थ तीळ, तो जेवढा लहान तेवढाच तो देण्यामागची कल्पना भव्य, दिव्य आहे. त्यायोगे मनात वितुष्टापासून दूर राहण्याची प्रवृत्ती निर्माण होते. हवेतील थंडावा निरोगी व दीर्घ आयुष्याचा आशीर्वाद 'देता' होतो. व्यष्टीतील बदल समष्टी संबंधाचे समृद्ध ऐक्य निर्माण करणारी ही संक्रांत म्हणजे पर्वणीच! तिळगुळाच्या वायूपासून मनातील विकल्प विरतात. बौद्धिक पातळीवरील बंधुभाव वृद्धिंगत होतो. अशी साजरी होते खरी संक्रांत!

हस्तस्य भूषणम् दानम्।

दान देण्यातून, देवाण -घेवाणीतून, लुटण्याच्या संकल्पनेतून, मोठ्यांनी लहानांना तिळगुळ देण्यातून प्रेमाने वागण्याची व वागवण्याची कल्पना परस्परांत वाढीस लागते. आपलेपणा वृद्धिंगत होतो. आजच्या दहशतवादी वातावरणात याची फार गरज आहे.

संक्रांत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पुण्यकाळाची मानली जाते. हे सूर्याचे संक्रमण म्हणजे क्रमण करून जाणे, पुढे जाणे हा विचार सार्वकालीन आहे. काळ, विज्ञान, विचार, ज्ञान ह्या सर्वच दृष्टीने दरवर्षीच जागतिक प्रगती वायुवेगाने होते आहे. त्यात स्थान प्राप्त करण्यासाठी मानवाला पुढे जावेच लागते. त्यातही हा उत्तरायणाचा

प्रारंभ, शुभकारक. दिनमान वाढण्याचा हा काळ म्हणजे विचारांचे सामर्थ्य, क्रियाशीलता वेगवान करण्याचा हा संदेश संक्रांतीचा नैसर्गिक संदेश.

धार्मिक दृष्टीने संक्रांती ही भयंकर रूप धारण केलेली देवी आहे. संकरासुराच्या नाशासाठी तिची योजना. साठ योजनांच्या या प्रदीर्घ कालात या देवीने प्रत्येक वर्षी आपले वाहन, आयुधे, भूषणे बदलली. हा बदल देवाप्रमाणे मानवालाही मान्य आहे. त्यादृष्टीने आज माणसाच्या मनातील भावभावना पारंपरिक, कोमल, आनंददायीच आहेत असे नाही. त्याही भयाकारी, महाक्रूर अतिरेकी झाल्या आहेत. त्यांचा नायनाट ही देवी आपल्या नऊ हातांनी आणि पुरुषाच्या पराक्रमानी प्रत्येक व्यक्तीने करण्याची आठवण करून देणारी संक्रांत आहे.

तिळगूळ देणे ह्यातील 'देणे' ही संस्कृती. त्यानिमित्ताने शेजारधर्म वाढवायचा, आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये, टॉवर संस्कृतीत तर या भावाला फार मानाचे स्थान आहे. आध्यात्मिक दृष्टीने संकरासूर म्हणजे चांगल्या - वाईट गोष्टींचे मिश्रण. त्यातील वाईटाचा समूळ नाश म्हणजेच संकरासुराचा नाश.

नवीन लग्न झालेल्या मुलीला हलव्याच्या दागिन्यांनी सजवून सासरविषयी, त्या माणसांविषयी, ममता, आपुलकी वाढविली जाते. 'संक्रांत येणे' म्हणजेच अनर्थ ओढवणे. अशा अनिष्ट, परिणामांची, बाधा होऊ नये म्हणून लहान मुलांना 'बोरनहाण' घालण्याची प्रथा आहे. त्यानिमित्ताने लहानांमध्येही भयाचा भाव मावळून मैत्रभाव निर्माण होतो.

या सणाचे विशेष म्हणजे मैत्री टिकवणे व वृद्धिंगत करणे, एकमेकींच्या अडचणी व दु:ख समजून घेण्यासाठी 'हळदीकुंकु' समारंभाचे विशेष महत्त्व आहे. रोजच्या धावपळीच्या दिवसात सजण्याचा, एकमेकींच्या घरी जाण्याचा विरंगुळा मिळतो. मनाला फार मोठे समाधान देते. 'तुझं माझं अहेवलेणं। वडासारखं त्याचं वाढणं।

सौभाग्यवृद्धीचा हा भाव काय सांगतो? तर प्रदूषण मुक्त जीवन व विचार काळाला सुसंगत आहेत त्याचा स्वीकार करा.

संक्रांतीच्या निमित्ताने आपल्या बाहेरगावच्या नातेवाईक व मित्रपरिवाराला भेटकार्डातून हलवा - तिळगूळ पाठवून मैत्रीचा धागा अधिक मजबूत केला जातो. ती छोटी पाकिटे, तिळगुळाच्या पिशव्या यामधील आलेला तो काटेरी हलवा कधी सांडू दिला नाही. त्याचे स्मरण आनंदाचा आस्वाद देतो. समाधान ही आपली संस्कृती आहे. सर्वांना सुखी करणे हे आपले कर्तव्य आहे. आशीर्वादासाठी मोठ्यांपुढे वाकणे ही नम्रता आहे. सूर्योपासना करणे, रोगमुक्त होण्यासाठी आहे. त्याच्यापाशी प्रखर व तेजस्वी बुद्धि मागणे, प्रकाशाची मागणी करणे, भारनियमन काळात सौर ऊर्जा घेणे म्हणजेच सूर्यपूजा आहे. हीच खरी रथसप्तमी आहे. त्याच्या सहाय्यानेच अंधार नाहीसा हातो, चराचराला जीवनामार्ग सापडतो. म्हणून म्हणते, प्रत्येक सणांमागील उद्देश समजता की साध्य दूर रहात नाही.

**सौ. उषा जयंत कळमकर**
मुख्याध्यापिका,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.),
ठाणे

●●●

**हे ईश्वरा, सर्वांना सुखात, आनंदात ठेव त्यातच माझे सुख सामावले आहे.**

**– एक प्रार्थना.**

प्रत्येक गोष्टीला एक सोनेरी किनार असते; तिचा आधी शोध घ्या.

# ऊरूम्ची शहरातील लाल टेकडी

*डॉ. सुधाकर आगरकर यांच्या चीन दौऱ्यातील निरीक्षणे टिपणारे प्रवासवर्णन प्रवाही शैलीमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. त्यातील हा पुढचा भाग - संपादक*

ऊरूम्ची शहराच्या आठवडाभराच्या वास्तव्यात अनेक प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्याचा योग आला. त्यातील लाल टेकडी हे एक होय. ही टेकडी शहरातच असून आमच्या राहण्याच्या हॉटेलपासून जवळच होती. टेकडीवरचे दगड आणि माती लालसर रंगाची असल्याने तिला चिनी भाषेत हाँग शांन, म्हणजे लाल टेकडी असे नाव पडले. ऊरूम्ची शहरातील ते एक महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ आहे. या शहरात येणारी प्रत्येक व्यक्ती या टेकडीला न चुकता भेट देते. हॉटेलपासून जवळ असल्याने अगदी काही मिनिटाच्या बस प्रवासानंतर आम्ही टेकडीवर पोहोचलो.

थोडे वर चढून गेल्यावर आपल्या नजरेत भरते ते बुद्धमंदिर. या मंदिराची निर्मिती टँग राजवटीत इ.स. ६१८ ते ९०७ या कालावधीत करण्यात आलेली आहे. मंदिराच्या चारही बाजूंना भिंत बांधलेली आहे. प्रवेशद्वारातून आत जाताच मंदिराची भव्यता आपल्या नजरेत भरते. मंदिराची रचना सर्वसाधारण चिनी मंदिरासारखीच आहे. आपण जेव्हा मंदिरात प्रवेश करतो तेव्हा बुद्धाची सहस्त्रभुजा मूर्ती आपले लक्ष वेधून घेते. प्रत्येक हातात काहीना काही वस्तू असल्याचे आपल्या लक्षात येते. त्यात शंख, कमळ, धनुष्य, भाला अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. तेथील काही व्यक्तींकडून आम्ही मूर्तीबद्दल माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. दानव आणि समाजकंटकापासून मानवाचे रक्षण करणारा हा देव अशी लोकांची समजूत आहे. अनेक प्रकारची कामे करण्यासाठी या देवाला अनेक प्रकारची अस्त्रे लागतात. विशेष हे की, यातील प्रत्येक अस्त्र वापरण्याचे कौश्यल्य त्या देवाकडे आहे अशी लोकांची श्रद्धा आहे. या सहस्त्रभुज मूर्तीचे छायाचित्र काढण्याची आमची खूप इच्छा होती. परंतु त्या देवळात छायाचित्रण करण्याची बंदी असल्याने आमची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. तरीही मूर्तीशेजारचे दिवे लावून तिथल्या व्यक्तीने मूर्तीचे चांगले दर्शन होईल अशी व्यवस्था केली.

टेकडीवर सुंदर बाग विकसित करण्यात आली आहे. रंगीबेरंगी फुलझाडांबरोबर बागेत कृत्रिम रीतीने तयार केलेल्या अनेक आकर्षक वस्तू आढळतात. त्यातल्या त्यात प्लॉस्टिकचे चमचे वापरून तयार केलेली चक्राकार आकृती आपले लक्ष वेधून घेते. त्याच्याच जवळ मणी वापरून मोर तयार केलेला आहे. या वस्तूंजवळ आपले छायाचित्र काढण्याची इच्छा सर्वच पर्यटकांना अनावर होते. पुढे जाण्यापूर्वी प्रत्येक व्यक्ती या पार्श्वभूमीवर आपले छायाचित्र काढतेच. अगदी साध्या वस्तूंपासून निर्माण केलेली ही कलाकृती आपल्या मनात घर करून राहते. डोंगराचे हे जे सौंदर्य आपल्याला पाहायला मिळते ते अलिकडचेच आहे. ५०-६० वर्षापूर्वी हा डोंगर बोडका होता. १९५० मध्ये शिनजँग प्रॉविन्सने झाडे लावण्याचा सपाटा सुरू केला. त्या कार्यक्रमात या डोंगरावर देखील झाडे लावून ती जगवली गेली. त्यामुळे डोंगराचे रूप संपूर्ण पालटले. अख्खा डोंगर आता वनश्रीने झाकलेला आहे.

आपण जसे पुढे जातो तसे एक सुंदर प्रवेशद्वार आपले स्वागत करते. या प्रवेशद्वारातून आत जाताच एक सुंदर बहुमजली इमारत आपले लक्ष वेधून घेते. इमारतीच्या तळमजल्यावर ऊरूम्ची शहराची एक मोठी प्रतिकृती ठेवण्यात आलेली आहे. या प्रतिकृतीत शहर आणि त्याच्या आजूबाजूचा परीसर दाखविलेला आहे. ही प्रतिकृती पाहून

आपण पहिल्या मजल्यावर जातो तर तेथे मोठे प्रदर्शन आपल्या नजरेत भरते. या प्रदर्शनात ऊरूम्ची शहराची वेगवेगळ्या काळातील चित्रे दाखविली आहेत. रेशीम वाटेवरील (Silk Route) एक लहानसे खेडे ते एक औद्योगिक शहर हा विकास कसा झाला याची कल्पना आपल्याला या प्रदर्शनातून येते. सगळ्यात वरच्या मजल्यावर एक वेगळेच दृश्य आपल्याला पाहायला मिळते. तिथे एक लंबक लोंबकळताना आपल्या नजरेस पडतो.



**लाल टेकडीवर भेटलेले स्थानिक लोक**

त्या दृश्याचा अर्थ समजण्यासाठी एक महत्वाची गोष्ट समजणे आवश्यक आहे. संपूर्ण आशिया खंडाचा विचार केल्यास ऊरूम्ची हे शहर या खंडाच्या मध्यभागी येते. असे ठिकाण ऊरूम्ची शहराच्या जवळ असून तेथे असाच मोठा लंबक लोंबकळत ठेवलेला आहे. त्याची लहानशी प्रतिकृती या इमारतीत ठेवलेली आहे.

**लाल टेकडीवरील फलक :**

आशिया खंडाच्या मध्यभागी वसलेले शहर याखेरीज ऊरूम्ची शहराची आणखी एक ओळख आहे. ती म्हणजे कोणत्याही समुद्रापासून सर्वात जास्त अंतर असलेले हे ठिकाण आहे. प्राचीन रेशीम वाटेवरचे ते एक महत्वाचे ठिकाण होते. रेशीम वाटेवरून जाणारे व्यापारी या ठिकाणी विश्रांतीसाठी आणि व्यापारासाठी थांबत असत. आताची ऊरूम्ची शहराची ओळख एक औद्योगिक शहर अशी आहे. या शहराचे मनोहारी दृश्य इमारतीच्या वरच्या मजल्यावरून दिसते. शहरात अनेक बहुमजली इमारती असल्याचे आपल्या सहज लक्षात येते. त्याचबरोबर शहरातील रूंद आणि सरळ रस्ते आपल्या नजरेस पडतात. याखेरीज शहरातील झाडी आपल्या नजरेस पडते. उंच इमारती सोडल्या तर कमी उंचीची घरे या झाडामागे लपून जातात. शहरापासून दूर नजर टाकली तर मात्र सर्वत्र वाळवंट दिसते. या वाळवंटात वसलेले नंदनवन असेच ऊरूम्चीचे वर्णन करता येईल.

लाल टेकडीच्या एका टोकाला आणखी एक टेकडी आहे. या टेकडीकडे सर्वच पर्यटक जात असतात. तिथे पोहोचण्यापूर्वी आपल्या नजरेस पडतो तो एक मोठा पुतळा. हा पुतळा नेमका कोणाचा, असा प्रश्न आपल्या मनात येतो. त्याची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला असता असे लक्षात येते की हा पुतळा एका शक्तीचे प्रतिरूप दर्शवतो. त्याचे दर्शन घेऊन आपण उंचवट्याकडे वळतो. येथे दगडाचे स्वरूप आपल्या लक्षात येते. थोड्याशा निरीक्षणाअंती असे कळते की हे सर्व गाळाचे खडक आहेत. याचाच अर्थ हा भाग कधीतरी समुद्राच्या तळाशी असून पृथ्वीच्या हालचालीत हा भाग वर उचलला गेला असावा. पर्यटकांच्या सोयीसाठी वर जाऊन खाली येण्यासाठी पायऱ्या केलेल्या आहेत. उतरणारी वाट एका लहानशा बोगद्यातून येते. या बोगद्यातून जाण्यासाठी रांग लावावी लागते. आपण वर जातो तर आपल्याला एक उंच मनोरा दिसतो. हा खरा नऊ मजली पगोडा असून झेंग-लाँग-ता असे त्याचे नाव आहे. युआन राजवटीत साधारणपणे १४ व्या शतकात तो बांधला गेला. त्याची उंची २५ मीटर असून बांधल्यापासून तो त्याच आवस्थेत आहे. सकाळी आणि संध्याकाळी हा पगोडा अतिशय सुंदर दिसतो. ऊरूम्चीच्या दूरचित्रवाणी



लाल टेकडीवरील पुतळा



लाल टेकडीवरील मनोरा

केंद्राने या पगोड्याच्या चित्राचा बोधचिन्ह म्हणून उपयोग केलेला आहे.

लाल टेकडीचे दर्शन घेऊन आम्ही परतीच्या वाटेला लागलो तेव्हा फुलांफुलांनी सजवलेल्या चिनी लीपीतील काही अक्षरांकडे आमचे लक्ष गेले. आमच्या सोबत असलेल्या चिनी व्यक्तीकडे आम्ही चौकशी केली असता असे कळले की, 'सर्व जग एक आहे' असे त्यात लिहिलेले होते. याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की एकात्मता दाखविण्यासाठी वापरलेल्या अक्षराचा उच्चार देखील एक असाच आहे. विश्वबंधुत्त्वाची कल्पना ज्ञानेश्वरांनी १२ व्या शतकातच मांडली. त्याच कल्पनेचा आधार चिनी लोक घेत आहेत हे पाहून आनंद वाटला. काही आठवड्यातच बिजिंगला ऑलिंपिकचे आयोजन व्हायचे होते. या पार्श्वभूमीवर या प्रकारची वाक्ये अनेक ठिकाणी लिहिलेली होती. त्यातल्यात्यात फुलांच्या रंगानी सजवलेली ही अक्षरे मात्र फारच मनमोहक दिसत होती. विश्वबंधुत्वाची शिकवण घेऊनच आम्ही लाल टेकडीचा निरोप घेतला.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

## जागतिक तापमान व वाहतुक

नॉर्वे मधील सेंटर फॉर इंटरनॅशनल क्लायमेट अँड एनव्हिरॉनमेंटल रीसर्च (CICERO) चे जॅन फ्युग्लेस्टवेर व सहकारी यांनी हवामानाचा दर्जा खालवण्यास रस्त्यावरील वाहने सर्वाधिक जबाबदार असल्याचे म्हटले आहे. वाहनांतून निर्माण होणाऱ्या प्रदूषकांचे संशोधन करता त्यांनी 'ग्लोबल वॉर्मिंग' वाढत असल्याचे निष्कर्ष काढले आहेत.

मोटारी व ट्रक यांमुळे निर्माण होणारे तापमान (२००० साली) सर्व विमानांतून निर्माण होणाऱ्या तापमानाच्या सातपट जास्त आहे, असे हा अभ्यास सांगतो. इंग्लंड मधील टिंडाल सेंटर फॉर क्लायमेट चेंज रीसर्च चे ॲलायीस बोडल यांनी हे निष्कर्ष अतिशय वास्तव व पर्यावरणाच विचार करण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे म्हटले आहे. तरीही २००० सालानंतर वाहतुकीतील वाढही या जागतिक तापमान समस्येत गंभीर ठरत आहे असे त्या म्हणतात.

**न्यू सायंटिस्ट २९ नोव्हें. २००८ आधारित**

# गीता आणि दैनंदिन जीवन

## लेखांक तिसरा

*गीता हा भारतीय तत्त्वज्ञानाचा गाभाभूत ग्रंथ आहे. जीवनदृष्टी देणाऱ्या या महान ग्रंथावरील लेखमालेतील हा पुढील लेख - संपादक*

**योग व त्याची वैशिष्ट्ये :**

गीता योगशास्त्र आहे. हा शब्द गीतेत वारंवार येतो. प्रत्येक अध्याय समाप्ती 'योगशास्त्रे' या शद्बाने केलेली आहे. गीतेचे अठरा अध्याय हे अठरा प्रकारचे योगच आहेत असे म्हणावयास हरकत नाही. शिवाय ग्रंथनिविष्ट बुद्धियोग, अभ्यास योग, अनन्य योग, आदी आहेतच. यामुळेच श्रीकृष्णाला योगेश्वर हे अभिधान सार्थ वाटते. अर्जुना तू योगी हो असे श्रीकृष्ण त्याला सतत सांगत आहेत. (तस्मात् योगी भवार्जुन) योग शद्ब गीतेत कोणत्या अर्थी योजला आहे ते समजून घेणेआवश्यक आहे. योगाचे अनेक अर्थ संभवतात. १) परमेश्वराशी संबंध जोडणे २) परमात्म्याशी सख्यत्व निर्माण करणे ३) अनपेक्षित काही घडणे इत्यादी. परमेश्वराशी नाते जोडण्याचे अनेक मार्ग संभवतात. दैवी गुण संपादनाने कर्माचे आचरण करणे ही साधना होय. परमात्मा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् असल्याने त्याच्याशी जवळीक साधल्याने त्याच्यातील दैवी गुणांचा ओघ आपल्याकडे वळेल व आपले जीवन सुंदर, उदात्त व उत्तुंग होण्यास मदत होईल. हा योगाचा मूलभूत अर्थ योक (Yoke) या अर्थी जुळतो. योक म्हणजे जूं. दोन बैलाना एकत्र ठेवण्यासाठी केलेली रचना. इथे जीवात्मा व परमात्मा एकत्र साधले जावेत याचा विचार 'योग' शब्दाने केलेला आहे. योग याच्या विरोधी अर्थाचा शद्ब 'संग' आहे. योगात ईश्वर व जीव याची सांगड अभिप्रेत आहे आणि 'संग' इथे बाह्य पदार्थ व मन याची सांगड घातली जाते. परमात्म्याशी जोडला जातो त्याला युक्त म्हणतात आणि बाह्य पदार्थाशी जोडला जातो त्याला सक्त म्हणतात. सक्ताला युक्त करणे हे गीतेला अभिप्रेत आहे. बाह्य पदार्थावर आसक्त असलेल्या मानवाला परमात्म शक्तीच्या विराट रूपाशी जोडावयाचे हेच गीतेचे कार्य आहे.

योगाची व्याख्या गीतेत दोन प्रकारे करण्यात आलेली आहे. १) योग: कर्मसु कौशलम्। २) समत्वं योग उच्चते। विशेष नैपुण्य आणि हुशारीने कर्म करण्याची हातोटी हा पहिला अर्थ. कोणत्याही परिस्थितीत मनाची साम्यावस्था न बिघडता कर्म करत राहण्याची क्षमता हा दुसरा अर्थ आहे. आचार्य म्हणतात, कर्मातील बंध टाकून देऊन कर्म करण्याची हातोटी जपण्याची पर्वा न करता कर्म करत राहणे आणि ते कुशलतापूर्ण करणे या दोनही गोष्टी गीतेला अभिप्रेत आहेत.

**गीतेतील धर्म :**

दैवी ज्ञान हा शद्ब गीतेत नेहमी येतो. त्याचे नेमके गमक काय हे समजावून घेणे आवश्यक आहे. दैवी ज्ञानाने आम्ही प्रभावित होतो. दैवी शक्तीमुळे आम्हांस सामर्थ्य प्राप्त होते. यामुळे त्यांच्या आज्ञेचे पालन करीत राहणे हेच आपले काम आहे. धर्म म्हणजे केवळ पोकळ विधान नव्हे. ठोकळेबाजपणाने मांडलेला विचारही नव्हे, अथवा केवळ कर्मकांडही नव्हे. धर्म म्हणजे जाणीवपूर्वक जीवभाव परमात्मभावाशी संलग्नित करणे होय. यामुळे मानवाला कोणतीही गोष्ट सहन करण्यास सामर्थ्य प्राप्त होते. प्रगत होण्यास उत्साह निर्माण होते, जे सत्य आहे त्याचे शोधन करण्यास दिव्य दृष्टी प्राप्त होते. योग्य मार्ग अनुसरण्यास बुद्धीला चालना मिळते. मोठाली कृत्ये पार पाडावयास

उत्तेजन मिळते. जीवन यशस्वी होते. हे धर्म जीवन, हेच दिव्य जीवन व हेच धर्म रहस्य होय.

**योग सततचा असणे आवश्यक :**

जीवनात जितके प्रसंग येतात तितक्या प्रकारचे योग संभवतात. योग जीवनाचे मुख्य सूत्र आहे. जो नित्ययुक्त आहे अथवा जो योगी आहे तो सर्वश्रेष्ठ मनुष्य वा आदर्श मानव होय. ईश्वराशी नित्य अनुसंधान हेच गीतेतील ज्ञान आहे. केवळ ध्यान, प्रार्थना व विशिष्ट वेळी परमात्मभाव अपेक्षित नसून सदा सर्वकाळ, खंड न पडता त्याचे अनुस्मरण असणे अत्यंत आवश्यक, असे गीता सांगते. परमात्म्याचा नित्य सहवास घडला पाहिजे. तो काही वेळापुरता न राहता अखंड असावा ही गीतेची शिकवण आहे. (तस्मात् सर्वेषु कालेषु मां अनुस्मर।) अर्ध वेळ सेवा अर्ध वेळ इतर उद्योग संभवू शकते. मात्र अर्ध वेळ भक्ती व इतर वेळी स्वैर वर्तन हे गीतेला अभिप्रेत नाही. श्री रामकृष्ण या संबंधी नेहमी एक उदाहरण देत असत. घरातील माशी काही वेळ मिष्टान्नावर बसते व दुसऱ्या क्षणी घाणीवर बसते. परंतु मधमाशी फक्त दोनच ठिकाणी बसते. फुलातील मध चाखण्यासाठी अगर मोहोळात. अन्यत्र बसत नाही. ती सतत मधच खाते. साधकाने मधुमसिका व्हावे. या वरून परमात्मभाव सदा सर्वकाळ का पाहिजे हे ध्यानात येईल. सांप्रत फार कमी मंडळी या विचाराची आढळतात. नित्ययुक्त हेच सर्व श्रेष्ठ जीवन निर्माण करू शकते. योगाचा हा उत्कृष्ट आदर्श गीतेने मानवासमोर ठेविला आहे.

**ऐहिक व पारलौकिक :**

आपले संपूर्ण जीवन आणि आपले संपूर्ण व्यक्तिमत्त्व दैवी व्हावे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे गीता सांगते. तरच संपूर्ण जीवन हे समर्पित स्वरूपाचे होऊ शकेल. मूलभूत प्रयत्नात व साधनेत परमेश्वराकडे नेण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे (स्व कर्मणा नं अभ्यर्च्य सिध्दिं विदन्ति मानना:। गी. १८/४५) तुम्ही शिक्षक असाल तर ज्ञान दानातून, डॉक्टर असाल तर रुग्णाइतांचे रोग बरे करून, कामगार असाल तर कुशलतेने यंत्रचालन करून, प्रशासक असाल तर उत्कृष्ट प्रकारे शासन करून, करागीर असाल तर कुशल कारगिरी करून - ज्या कोणत्या कामात तुम्ही असाल त्या कामात कल्पकतेने, योग्य वेळात, काटकसरीने आणि सर्वांच्या हिताचे होईल अशा पद्धतीने वागलात, तर प्रत्येकाचे कल्याण झाल्यावाचून राहणार नाही. यालाच योग असे म्हणतात. जी गोष्ट विशेष साधनेने - जप वा ध्यानाने - साध्य होते तीच शुद्ध कर्माने साधता येते. शुद्ध हेतूने प्रत्येक कर्म योगच होय. शुद्ध हेतूने केलेल्या ऐहिक गोष्टी धार्मिक गोष्टीं इतक्याच प्रभावी होतात. सामाजिक सेवा, उदात्त हेतूने केलेल कर्म, धर्म साधना या एकमेकांस पूरकच ठरतात. किंबहुना यानी सर्वांचेच कल्याण होते हीच खरी धर्मसाधना. संपत्ती संग्रह वाईट नाही मात्र त्याचा विनियोग लोक कल्याणासाठी झाला पाहिजे. संपत्ती त्यागापेक्षा उपभोग त्याग हा महत्त्वाचा. मालकी हक्काचे विसर्जन करून विश्वस्त भूमिका स्वीकारणे योग्य. इहलोक परलोकाहून वेगळे नाही. कर्म कोणत्या हेतूने केले जाते हेच महत्वाचे. सद्हेतू प्रेरित कर्मे कल्याणकारक ठरतात. तसेच दुष्प्रवृत्तीच्या मिलाफाने तेच कर्म अहितकारक ठरते. गीता सांगते, कर्म पूर्ण मनाने उत्साहाने आणि नि:स्वार्थपणे करावे. त्यातच कल्याण आहे. कर्म ही ईश्वरीसेवा, मिळणारे फळ भगवंताचा प्रसाद. प्रसाद हा सर्वांना वाटून स्वीकारायचा असतो. तसा विनिमय करत राहिल्यास सारे जीवनच यज्ञमय बनेल आणि संपूर्ण जीवनच एक प्रकारचा योग होईल.

**वासना रहितता :**

हा शब्द गीतेत वारंवार येतो. त्यावर विजय संपादन करावे असे गीता सांगते. सर्व वासनांचा नाश गीतेला अभिप्रेत नाही. कारण वासना संपूर्ण अंशाने कधीच क्षीण होत नाहीत. श्रीकृष्ण म्हणतात. धर्म अविरूद्ध भूतेषु काम: अस्मि। (गी ७.११) धर्माला अविरोधी काम (वासना) मी आहे. वासना मारून टाकणे हा उपाय नसून त्याचे नियंत्रण

करणे योग्य ठरेल. उदात्त वासना कल्याणकारकच ठरतात. वासनांचे नियंत्रण कसे करता येईल हे पहावे लागेल. १) वासना दडपणे २) चुचकारणे ३) उदात्तीकरणाने आत्मसात करणे. जनहितावर निखारा ठेवणाऱ्या वासनांचा निर्दयपणे नायनाटच केला पाहिजे. संगति दोषामुळे निर्माण झालेल्या वासनांना समजुतदारपणे पुन:मार्गावर आणावे. वासना उदात्त करून त्यांच्या करवी समाज कल्याण साधणे हे सर्वात उत्कृष्ट. तीनही पद्धती आपआपल्या परीने योग्य परंतु अपुऱ्या आहेत म्हणून त्याचे नियंत्रण करणे श्रेयस्कर. त्यांचा तिरस्कार करण्याने हे साधणार नाही. कौशल्याने हाताळावे लागेल.

वासनांबद्दल काही गैरसमज पसरले आहेत. त्या दूर करणे योग्य. ऐहिक वासना आध्यात्मिक मार्गात अडथळा आणतात म्हणून या त्याज्य. या विचारामुळे आपले ऐहिक जीवन उध्वस्त झालेले आहे. जीवनाचे डबके झाले आहे. सर्व प्रगती खुंटली आहे. आपण बालहीन व दरिद्री झालो आहोत. कारण ऐहिकासाठी लागणारे परिश्रम, कला, कौशल्य याची हेळसांड केली गेली. उद्योग व्यापार उदीम या साऱ्यांत उदासीनता स्वीकारली. पावित्र्य याचा अर्थ भलताच लावला. पावित्र्य म्हणजे शुद्धता ही शुद्धता जीवन उन्नत करण्यासाठी उपयुक्त असते म्हणूनच कोणतेही कर्म शुद्ध मनाने करावे हेच इथे अभिप्रेत आहे. तुकाराम महाराज म्हणतात - जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। इकडे आपण दुर्लक्ष करतो. धन वा संपत्ती याचा मालक ईश्वर. आपणाकडे त्याची ठेव म्हणून स्वीकृती झाली पाहिजे आणि त्याचा विनियोग जनकल्याणासाठीच होणे आवश्यक. ही ठेव परमेश्वरी कृपेने आपणाकडे सांभाळण्यासाठी मिळाली आहे यातच धन्यता मानणे आवश्यक. परंतु आपल्या मनाचा दुबळेपणा झाकण्यासाठी आपण धनालाच निंद्य ठरविले. हा असा लौकिक व्यवहार शुद्ध मनाने करत उत्तम प्रकारे जनकल्याण साधून त्यातून बाहेर पडावे व पुढील येणाऱ्या पिढीला एक उदाहरण घालून द्यावे. ही भूमिका स्वीकारणे अगत्याचे आहे. हीच कल्याणकारक गोष्ट आहे. फूल विकसित झाल्यावर त्यातील सुगंध सर्वत्र पसरतो तसेच शुद्ध हेतूने कर्म केल्यास ही कल्याणमयता सर्व विश्वात पसरते अशा प्रकारे जीवनाची रचना निर्माण करण्यात मानवाने यशस्विता प्राप्त करून घ्यावी अशी गीतेची शिकवण आहे. जे काही जीवनात घडत राहील ते सारे ईश्वर पूजन. म्हणूनच घडो अशी धारणा सदैव राहावी. हीच प्रेरणा हजारो वर्षे गीता तुम्हां आम्हांला देत राहिली आहे. ही शिकवणच कल्याणाचे द्वार आहे. आपणास गीताध्ययनाने हीच प्रेरणा मिळत राहो, अशी सदैव भगवान् श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना करू या.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानक जवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना
## (पूर्वार्ध)

लेखमालेतील पुढील लेखाचा पूर्वार्ध येथे देत आहोत उत्तरार्ध मार्च २००९ च्या अंकात - संपादक

**प्रास्ताविक :**

दिशाच्या नोव्हेंबर व डिसेंबर २००८ व जानेवारी २००९ च्या अंकात आपण खालील विषयांचा विचार केला; अर्थात अत्यंत सूत्र पद्धतीनेच!!

१) **संस्कृतिच्या विस्ताराचे, उगमाचे बीज** हे ह्या पृथ्वीवरील विशिष्ट भूभाग, पर्यावरण, नद्या, जीवन (मानवी, प्राणी, पक्षी व इतर) ह्यांच्या 'एका आत्मिक व त्यांच्यातील गूढ' नाते संबंधातील, **'स्पिरीच्यूअल प्रोग्रॅम'** मध्ये असते.

हे बीज सर्वसाधारण दृष्टिला उगमत व दिसतही नाही, पण त्याच्या वैशिष्ट्याची सूप्त जाणीव होते व प्राप्त होऊ शकते. शिवाय, हे 'बीज' अव्यक्त जगात अनंत काळाच्या सातत्याने अवतरत रहाते.

काळाच्या ओघात ह्या बीजाचे संवर्धन, विस्तार, ज्याप्रकारे होते व एक वैशिष्ट्य सुद्धा प्राप्त होते.

२) ह्या बीजाची रचना किंवा 'प्रोगॅम' हा कसा व कोण करतो, हे आपल्याला माहीत नाही, पण त्या बीजाच्या मूळ स्वरूपाच्या गुणवत्तेप्रमाणे व संकल्पने बरहुकुम त्याच बीजापासून उत्पन्न झालेला मानवी जीव, त्या बीजापासून स्फूरलेला किंवा अंकुरलेल्या कला, शास्त्र, जीवनशैली, सामाजिक नातीसंबध सामाजिक व आध्यात्मिक ध्येय, धोरणे व संकल्प ह्यांच्या प्रयत्नपूर्वक होणाऱ्या अविष्कारामध्ये भाग घेतो, हातभार लावतो, आणि अनुभूती व भोग सुद्धा प्राप्त करतो.

पण, ह्या संस्कृतीचा वैश्विक अव्याहत व अदृश्य स्त्रोत हा मात्र विश्वाच्या गूढ यंत्रणेमार्फत अनंत काळाच्या परिमाणाने चालू असतो. ह्यालाच डॉ. निहार रंजन राय **'शिल्पकर्म'** म्हणतात. वरील मूद्यांनाच दोन पारिभाषिक शब्द (आध्यात्मिक शास्त्रातील) **'देवशिल्प'** व **'मनुष शिल्प'** अशी नावे लागू पडतात. त्यांनी शोधलेल्या व भाष्य केलेल्या मूळ **'ऐतरेय ब्राह्मण'** ह्यातील उताऱ्यावर विसंबून ते हा आधार देतात. ह्याचा संदर्भ दिशाच्या जानेवारी २००९ पान २३ वर पहा. हे पुस्तक 'Oriental Institute Studies- शाहू मार्केट, ठाणे, ह्या लायब्ररीत उपलब्ध आहे. (क्रमांक म - ३२७१ पान नं २४८.) भाषांतर: गो. वि. विव्दांस यांनी केलेले आहे.)

**वैदिक बीज संकल्पना :**

हा संदर्भ मी एव्हढ्या विस्ताराने कां देतो आहे? कारण, त्याला तितकेच महत्त्व आहे. ज्या ऐतरेय ब्राह्मणामध्ये ह्या शिल्प कृति बद्दल **''ॐ शिल्पानि शंसान्ति देव शिल्पानि। एतेषां वै देव शिल्पानाम् अनुकृतित शिल्पम् अभिगम्यते...''**, ह्याचा उतारा ते उद्धृत करतात, तो 'संस्कृतीकरण' ह्या संकल्पनेचा मूळ आध्यात्मिक, आगमशास्त्रातील वा 'स्पिरीच्यूअल सायन्स' मधील आधार आहे. ते म्हणतात तसेच, ''**सन्तान प्रजनन क्रिया को भी 'शिल्पकर्म' कहा गया है।**'' याचा अर्थ मानवी जीवाचा ह्या पृथ्वीवर जन्म होतो त्यापूर्वीच - त्याच्या आत्म्यावर जो संस्कार बीजाच्या स्वरूपात केला जातो, त्याचा संदर्भ आहे.

थोड्या विस्ताराने ही संकल्पना (Concept) सांगणे प्रस्तुत ठरेल. ''भौतिक विज्ञानाला'' सृष्टीमध्ये निर्माण

झालेल्या कुठल्याही गोष्टीचे मूळ निर्मीती तंत्र, बीज व स्वरूप कां व कसे उत्पन्न झाले त्याचा थांगपत्ता नाही.

त्यामुळे जीवसृष्टी कशी व कां निर्माण झाली याचे पूर्ण व खरे ज्ञान ''भौतिक विज्ञान'' व अनेक जागतिक धर्म (Religion) ह्यांना बिलकूल नाही. त्या त्या धर्मातील अशा संकल्पना व वर्णने ही काल्पनिक आहेत, - मानव निर्मीत विचार आहेत, आणि केवळ धार्मिक विश्वास वा श्रद्धा ह्यांच्या बळावर (Ignorant Reverence), मानवी समाज विभक्तपणे त्या सांभाळतो आहे. विज्ञानाच्या भौतिक अविष्काराच्या आंशिक यशामुळे (Partial victory) ह्या विज्ञानाने मानवी समाजाच्या विश्वासावर आपला अंमल बसवला आहे. हा देखील केवळ ३०० / ४०० वर्षा इतकाच जुना आहे व केवळ 'मानव चंद्रावर गेला' ह्या प्रवासाच्या यशावर भराऱ्या मारल्या, तरी चंद्राच्या मूळ अस्तित्वावर व निर्मीतीबद्दल पूर्ण अज्ञान आहे. शिवाय ज्याला 'Indian Agenda' म्हणता येईल असे ह्या भौतिक 'इंडियन विज्ञानात' कांही सांपडत नाही. कारण उघड आहे, कीं हे वैज्ञानिक पाश्चात्य संस्कृतीचे सांप्रदायिक अनुयायी आहेत व त्यांना भारतीय स्पिरीच्यूअल विज्ञानाचा गंध नाही, उत्सुकता नाही व विश्वासही नाही. शिवाय, हे भारतीय विज्ञान 'को अहम्?' ह्या सारख्या कठीण प्रश्नाचे उत्तर समजण्याइतके सामर्थ्य बाळगून आहे त्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्याबद्दल त्यांना आत्मीयता नाही.

हे मी काही विज्ञानाच्या विद्वेषाने लिहित नाही तर त्याच्या ज्ञानाच्या मर्यादा, संकुचितता व सांप्रदायिक निष्ठांचे वर्णन करतो आहे. ही परिस्थिती खेदजनक आहे हे खरेच!!

पण, ह्याही पेक्षा दूसरे कारण महत्त्वाचे आहे ते असे कीं ह्या मर्यादीत यशाच्या प्रकाशांत प्रचलित अनेक धर्मात, सृष्टिनिर्मीती बद्दल जे भोंगळ विचार आहेत व संकल्पना आहेत, त्यांची वस्त्रहरणे केलेली इतिहासांत प्रत्ययास येऊनही, तेच वैज्ञानिक व धर्मांध पुढारीसुद्धा (Fundamental Truth) खऱ्या सत्याच्या संहिता वा पाठपुस्तकांबद्दल फारसे उत्सूक नाहीत व त्यांना वेळ सवड व योग्य विनीयोगाला सांपडत नाही. ज्ञानाच्या ह्या निमीच त्रुटी भरण्याची आवश्यकता दोघांनाही वाटत नाही. ही खरी खंत आहे.

तेव्हा, पुन्हा एकदा 'वैश्विक बीज' संकल्पनेकडे येऊ या'' ज्या संस्कृतीची उत्पत्ती, जोपासना व वृद्धी पृथ्वीवरील निरनिराळ्या भू भागावर झाली व होत आली, त्याचा संभार मानवी देहधारी व्यक्ती व समष्टिच वाहणार हे स्वाभाविक आहे. त्यामुळे ह्या मानवी देहाची रचना, सामर्थ्य, ''Potentiality of Human form'' हे युक्त व समर्थ असावयाल हवे व त्याचे 'जीवन सातत्य' ह्या कार्यासाठी अबाधित हवे. त्यामध्ये परस्पर सहकार्य हवे, गुणवत्ता हवी, नाही कां? मग हे कुठून प्राप्त व्हावे किंवा आतापर्यंत कसे झाले? याचा विचार इतिहासात फारसा झालेला दिसत नाही.

पण, हे सर्व वेद साहित्यात नुसतेच झाले आहे, एव्हढेच नव्हे, तर त्याचे प्रत्यक्ष ('Manual') नियमावली अनेक वेद, उपनिषद, ब्राह्मणे व पुराणात सापडते, हे मोठेच आश्चर्य आहे!!

ह्याचा अर्थ उघड आहे.

१) एकतर असा ज्ञानी समाज अस्तित्वात होता व तो जरी नष्ट झाला, तरी त्या समाजाने हे ज्ञान पुढच्या पिढ्यांना उपलब्ध केले आहे व त्याची देखभाल जन्मजन्मांतरी व पिढ्यानपिढ्या होईल, याची यंत्रणा व व्यवस्था केली आहे.

पण, मग विचार येतो कीं ह्या योजनेला लागणारे सामाजिक, आर्थिक, नैतिक व पोषक पर्यावरण व रचना कोण पुरवणार व कसे?

२) त्यामुळे, दुसरा पर्याय जास्त सुलभ व तात्विक दृष्ट्या शक्य वाटतो. तो म्हणजे ज्या जगन्नियंत्याने, सृष्टी निर्मात्याने मला, तुम्हाला व विश्वाला निर्माण केले त्यानेच हे

'सांस्कृतिक मानवी व सृष्टी बीज निर्माण केले असावे.

पण, ह्या सत्य जाणण्याच्या तर्क पद्धतीला जर मानवी बुद्धीचे एक यंत्रवत साधन समजले, तर त्याच्या खेरीजही सत्य (Reality) जापण्याची पद्धत आहे. फक्त ती आपल्या 'शिक्षणपद्धतीत नसल्याने तिचा परिचय आपल्याला नाही एव्हढेच नव्हे तर इतर धार्मिक किंवा आध्यात्मिक ज्ञानी मंडळी जर आपल्याला काही सांगत असतील, तर काही ऐतिहासिक कारणे किंवा सांप्रदायिकतेची वैगुण्ये किंवा निखळ पूर्वग्रह, यामुळे आपण त्या पद्धती वापरत नाही. पण, अशा काही ज्ञानपद्धती Epistemology अस्तित्वात आहेत. **''Vedic Epistemology''** ही अशी एक ज्ञान, सत्य जाणण्याची पद्धती आपल्या संस्कृतीच्या ठेवणीत आहे.

३) ही दूसरी पद्धत काय आहे, हे जाणण्याची खटपट आपण करणार आहोत. ती म्हणजे सरळसोट ह्या सृष्टीच्या निर्मात्याशीच त्याबद्दल चौकशी करणे.

वेद हे ईश्वर विश्वसित ज्ञान आहे. 'अपौरूषेय' आहे. याचा अर्थ मानव निर्मीत ज्ञान प्रकार नाही. म्हणजे काय?

**कॉम्प्यूटर अपौरूषेय नाही :**

कॉम्प्यूटर हे यंत्र मानव निर्मीत आहे आणि त्याच्या जोरावर बळावर २१ व्या शतकातील मानवी समाज ''प्रगती'' करत आहे. **पण ह्या यंत्राच्या मार्फत ''सांस्कृतीक बीजाचा तपास लगणे दूरापास्त आहे असे दिसते ना? त्याला प्रजननक्रियेचे सामर्थ्य व बीज नाही.**

**ऐतरेय ब्राह्मण व सांस्कृतिक शिल्पक्रिया :**

तेव्हां कुठल्याही मानवनिर्मीत भौतिक क्षेत्रातील यंत्र सामूग्री वा व्यवस्थेवर विसंबून, ही **जन्मजन्मांतरीची संस्कारक्रिया** होणे अशक्य आहे. ह्या मानवी जीवनांत नाशिवंत शरीर हे एक सर्वसाधारणपणे १०० वर्षे टिकणारे माध्यम वा यंत्रणा आहे. पण, तिचा भौतिक जगातीलही 'स्वामी' हा **जीवात्मा** आहे. संस्कार ह्या जीवात्म्यावर होतात त्यांना त्रिकालापलीकडील - कालत्रयातीत, देहत्रयातीत, गुणत्रयातीत अशा पद्धतीत असते त्या स्थितीत संस्कार व्हावयाला हवेत. ह्या संस्कार क्रिया त्यामुळेच एक तऱ्हेची **'शिल्पक्रिया'** आहे. ह्या शिल्पक्रियेचे स्वरूप पुष्कळ अंशी भौतिक प्राथमिक अवस्थेत मानवी प्रयत्नांनी व पृथ्वीवरील स्तरावर होते म्हणून त्याला **'मानुष शिल्प' असे ऐतरिय ब्राह्मण संबोधते.**

ह्या ब्राह्मणात ज्या सविस्तरपणे व निश्चिततेने ह्या क्रियांचे वर्णन केले आहे, ते वाचताना एक गोष्ट जाणवते कीं हे वर्णन ज्या कोणी ऋषींने केले त्याला त्या क्रिया प्रत्यक्ष करण्याचा अनुभव असला पाहिजे. त्यामुळे, निदान त्याच्या मनांत तरी कांही सुद्धा तिळमात्र संशय नाही हे ठसते.

एक कारण वा उदाहरण सांगतो. 'शिल्प' करण्याकरिता भौतिक स्तरावर माणसाला जी शस्त्रे किंवा उपकरणे लागतील तशीच ती त्या 'अव्यक्त' जगांत ह्या शिल्पक्रियेला लागत असतील, हे आपल्याला येथील अनुभवावरून पटावे. तिथे, हे ऐतरेय ब्राह्मण ह्या शिल्पे संकल्पनेचे स्पष्टीकरण देते. **''शिल्प'' म्हणजे आश्चर्यजनक व कुशलतेने केलेले 'कर्म' होय.''**

**देवशिल्पाचा मानुषशिल्पातील अविष्कार :**

आता पृथ्वीवरील आपली शिल्पे कितीही जिवंत वाटली तरी ती तशी नसतात. अजंठा, वेरूळ, खजूराहो किंवा मायकेल अँजेलो याची युरोपमधील 'शिल्पे' देखील, जिवंत कृती सारखी वाटली, काही ठिकाणी स्त्री शिल्पावरची ती रेशमीवस्त्रे अगदी पारदर्शक वाटली - (संगमरवरी दगडाची असूनसुद्धा), तरी ती जिवंत - प्राणयुक्त नसतात. 'मानुष शिल्पाचे' हे वैगुण्य किंवा त्रुटी म्हणता येईल.

पण, ह्या ब्राह्मणातील वर्णन केलेल्या शिल्पाबद्दल - कर्माबद्दल - मैत्रावरूणाला सागंताना उद्‌गार आहेत, **''रेतोरूप यजमानाला तूं प्राणांनी युक्त कर.''** **'रेत'** म्हणजे

आपण त्याचा अर्थ Sexual क्रिया कर्मात 'Semen' असा घेऊ, पण इथे त्याचा खरा अर्थ, ''**उत्पत्ति निर्माण करणारे तत्व**'' असा घ्यावयाचा आहे व तसाच निर्देश आहे. ही '**देवशिल्पे**' 'प्राणरूप' आहेत. मग असा प्रश्न पडेल की अशी 'देवशिल्पे' कोणती असावीत? तुम्ही राणीच्या बागेत भायखळ्याला कधी गेला असाल, तेव्हा 'मोराच्या' पिंजऱ्यासमोर, 'सिंहाच्या पिंजऱ्यासमोर उभे राहिल्यावर असे नाही का वाटत. की हा प्राप्ती हे एक 'देवशिल्पच' आहे. हा सुंदर मोर पक्षी ह्या त्याच्या प्रथम मिटलेल्या व नंतर आनंदाने उभारलेल्या नृत्य अविष्कारात एक 'देवशिल्पच' आहे. स्वत:च्या आंतरिक आनंदाचा बहीर्गत स्वरूप व आकार ह्यावरचे नृत्य हे त्याची 'शिल्पकृतीच' आहे.

सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या पिंजऱ्याच्या समोर उभे असणारे तुम्ही सुद्धा एक 'देवशिल्पच' आहात!! कुणी तुम्हाला हे रूप, तेज, प्राण, इंद्रिये व ज्ञान ग्रहण शक्तीची उपकरणे, भोग घेण्याची साधने ही सर्व ह्या शरीररूपी, प्राणयुक्त (फॉर्म) रूपात दिली?

**प्रजनन क्रिया सातत्य (Autopoesis) :**

स्त्री - पुरुष संयोगातून तुमचा जन्म झाला हे केवळ एक यज्ञ व यज्ञद्वारातून भूतलातील वास्तव्यात, प्रवेश करण्याचे द्वार - जैविक योनिद्वारा मधून आगमन होते. पण, हे रूप पूर्वीच निश्चित होते. एव्हढेंच नव्हे तर हे बीज एव्हढे विलक्षण आहे की ह्या एका 'फॉर्मला' पुन्हा पुन्हा आपल्या सारखाच आणखी फॉर्म तयार करण्याचे सामर्थ्य, देवकृपेने मिळाले आहे व तशी सोयिस्कर तरतूद आहे. फक्त त्याला आणखी एका भिन्न लिंगाची स्त्री किंवा पुरुष ह्याची जरूरी व सहकार्य असावे लागते. पण, अशी सहकार्याची तहान त्या भिन्नलिंगी फॉर्मला असण्यासाठी सुद्धा लैंगिक आकर्षणाची तरतूद या दैवी योजनेत आहे. ह्या दैवी योजनेला इतर संस्कृतीत न आढळणारी, पण भारतीय संस्कृती श्रद्धेने सलाम करते, स्तुती करते, नमस्कार करते व ऋण मान्य करते.

**शिल्पक्रियेची शस्त्रे :**

ह्या देवशिल्पाच्या क्रियेमध्ये जी शस्त्रे लागतात वा वापरली जातात त्यांची विशेष नांवे सुद्धा ह्या ब्राह्मणात आहेत. हा सुद्धा एक पुरावाच मानावा लागेल. अन्यथा हे एक Science Fiction म्हणले जाईल.

**'आज्य' नावाचे शस्त्र :**

यजमानाचे शरीर निर्माण करणारे आहे म्हणून त्याला ''अध्यात्म'' म्हणजे यजमान शरीराशी संबद्ध असणारे म्हणले जाते.

**'प्रऊग शस्त्र' :**

यजमान शरीराला संस्कार करणारे होय. म्हणून त्याला 'अध्यात्मतम' म्हटले जाते. ही मी फक्त उदाहरणादाखल काही नमूने दर्शविणारी वर्णने केली आहेत.

**संस्कृति का कृष्टि? :**

तेव्हा, पुन्हा एकदा **डॉ. निहार रंजन राय** हे रविन्द्रनाथ टागोर यांच्या '**संस्कृति**' ह्या शब्दाला व थोड्याश्या पाश्चात्य पद्धतिच्या भौतिकवादी संकल्पनेला, '**कृष्टि'** हा शब्दच का सुयोग्य व जास्त फिट्ट व वैदिकशास्त्र संमत, असा अर्थपूर्ण व गर्भपूर्ण आहे, हे सांगण्याचा खटाटोप कां करतात ते पाहू या.

डॉ. निहार रंजन राय हे अत्यंत सुबोध पद्धतीने ह्या लेखात संस्कृतिकरण, कृष्टिकर्म किंवा 'देव शिल्प' कृति व 'मानुष शिल्प' कृतीचे वर्णन करतात. त्यातील सूक्ष्म फरकही सांगतात.

पण, मी प्रथम हे सर्व मुद्दे फक्त एका सूत्रमय भाषेत इथे नमूद करणार आहे. त्यातील ज्या मुद्यांचा अर्थ प्राप्त होण्याला अडचण येईल, तिथे योग्य वेळी भाष्य व विस्तार

करूच. अर्थात, शिवाय, हे सूत्रबद्ध वर्णन मी माझ्या भाषेत करतो आहे. चुका झाल्यास क्षमस्व!!

१) **संस्कृति** ह्या शब्दापेक्षा **कृष्टि** हा शब्द भारतीय संस्कृतिच्या शास्त्रीय संकल्पनेची (concepts) व्याख्या चांगली करूं शकतो.

२) भारतीय परंपरेत **'कुल' आणि 'शील'** ह्या महत्वपूर्ण संकल्पना आहेत. **पाश्चात्य Culture** ह्या संकल्पनेत त्या स्पष्ट नाहीत.

३) **'कुल ही स्थिर संकल्पना आहे.'** स्थिर ह्या अर्थी की समाजाच्या अनंत काळच्या प्रवासात. दैवी जन्म, मृत्यू, पूनर्जन्म ह्या क्रियेने, जे संस्कार प्रत्येक जीवात्म्याला प्राप्त होतात ते **'कुलधर्म'** म्हणून जाणले जातात. ह्या कुलधर्माविरूद्ध वर्णन किंवा कर्म हे **Anti - Biological** जीवन धर्माच्या विरूद्ध होईल व त्यामुळे अध:पाताला व नुकसानीला कारण होईल.

४) **'शील'** ही संकल्पना 'कृष्टि' ह्या शब्दात व कर्मात सामावलेली आहे. **'उत्तराधिकार'** ह्या न्यायाने शीलाची प्राप्ती होते, असा सर्वसाधारण समज आहे, पण तो तितकासा खरा व पूर्ण नाही. कारण, 'शील' हे प्रत्येक पिढीला निर्माण करून कालप्रवाहात काळजीपूर्वक जतन करावयाला लागते. त्यामुळे **शीलाची 'निर्मीती क्रिया'** मूळ संस्कारापासून भिन्न वा अवनत वा खंडीत झाली कीं सामाजिक संस्कृतिचा ऱ्हास होतो. रूपभार मावळतो! उलट, त्यांत पारंपारिक संकल्पनेतील 'शील' स्वरूप जर पुन्हा नवीन पिढीत नुसतीच संभाळली जाऊन न रहाता, त्यांत **'नवीन मूल्यांची'** भर पडली तर त्या संस्कृतिची वाढ होते. **ह्या क्रिया 'कृष्टि' ह्या संकल्पनेत अनुस्यूत आहेत.**

**देवशिल्पाची सामुग्री :**

पण, **'देव शिल्प'** याची साधन सामुग्री ही **अव्यक्त जगात** पुरूषसुक्त आहे, व तिथेच ही देवशिल्प कृति कार्यरत असते. पण, ह्या **'देवशिल्पावर'** आधालेली पुढची 'व्यक्त' व भौतिक जगात जी **'मानुषशिल्प'** कृति समाजात केली जाते तिचा संबंध जाणणे व त्याच्या आधारावर 'मानुष शिल्प उद्धारण कृति' वा कर्म कारणे (**Incremental Action**) हे फक्त अशा समाजालाच शक्य आहे की ज्यांना योगिक, आध्यात्मिक **आत्मयज्ञ क्रिया** साधली आहे व ती सातत्याने अंगिकारिली जाते.

**संस्कृती व कृष्टिसाठी यज्ञ क्रियेची आवश्यकता :**

आता ह्या **'आत्मयज्ञाच्या'** शुद्ध व सत्य संकल्पनेच्या परिचयासाठी गेले कित्येक अंकात मी 'दिशा' मासिकाच्या माध्यमातून सन २००५ पासून, वेळोवेळी भाष्य केले आहे. महत्वाची सूचना ही कीं जे 'यज्ञ' सध्या नजीकच्या काळात भारतात केले गेले व जात आहेत ते या मूळ संकल्पनेपासून वेगळे दिखाऊ व शुष्क व प्राणरहित अशा क्रिया (सर्वसाधारणपणे) असलेले झाले आहेत. हे मी ठासून सांगू इच्छितो.

**दयानंद व अरविंदांचे कार्य :**

**वेद व वेदांचे खरे आध्यात्मिक अर्थ लावण्याचे अथक प्रयत्न स्वामी दयानंद (आर्य समाज) व नंतर महायोगी अरविंद यांनी केले.** त्यांच्या कार्याचा मुखवटा किंवा खऱ्या आत्मयज्ञाच्या पृष्ठभागाच्या स्तरावरील ज्ञानाचा परिचय सुद्धा सामान्य बहूजनांना व तथाकथित वेदज्ञानी मंडळींना नाही, असे मला मनोमन वाटते. माझ्या **शुन:शेप ह्या 'ऋग्वेदातील आख्यानांत'** ह्या यज्ञक्रियेने **आत्म्याच्या पाशापासूनही मुक्ती** मिळवण्याची योजनेवर भाष्य सापडेल.

४) तेव्हा ह्या 'देवशिल्प' व 'मनुषशिल्प' ह्यांचा अव्यक्त व व्यक्त जगातील (**unmanifest and manifest world**) जाणून केलेले **'कृष्टिकर्मच'** खऱ्या अर्थाने **'शील'** स्थापना व संवर्धन समाजात करू शकेल. ह्या ज्ञानाच्या पूर्ण अभावाने चाललेल्या जीवनकर्मानी, हा जगातील समाजाचा अध:पात आपण रोज व प्रत्यही अनुभवत

आहोतच.

५) **डॉ. निहाररंजन राय** पुढे म्हणतात, ''**इसलिए कला - साहित्य एवं कृष्टि - संस्कृति का प्रधान उद्देश ही नौतिक या Moral है।''**

**''कला एवं साहित्य का यह कार्य अर्थात कुरूप को सुंदर बनाना, बेसूरे बेताल या स्वरहीन एवं तालहीन के भीतर से स्वर एवं ताल निकालना, अस्त - व्यक्त को सुव्यस्थित करता एवं अर्थहीन को समर्थक करना, जिसे हम नीतिधर्म (Ethics) या आचार शास्त्र कहते है उसका भी कार्य है। ....**

**''Ethics उस मार्ग को ग्लानि एवं यंत्रणासे मुक्त करना चाहता है एवं मालिन्य तथा कालिमा को दूर करके मनुष्य के जीवन को सुव्यस्थित करने के लिए सहज एवं सुन्दर बनाना चाहता है। वस्तुत: इन्ही कारणों से ही भारतीय मानसमे Ethics एवं Aesthetics के साथ मंगल एवं सुंदर तथा शिव एवं आनंद का इतना घनिष्ठ संबध है।**

**आधुनिक मनुष्य दो खंडो मे विभाजित है। एक खंडमे वह व्यावहारिक एवं उपयुक्ततावादी है एवं दूसरे खंड मे रत्रष्टा है!**

**रविंद्रनाथ टागोर व डॉ. निहार रंजन राय :**

तेव्हा पुन: एकदा भारतीय 'संस्कृति' वा जास्त व्यापक अर्थाने 'कृष्टि' ह्याच्या अविष्काराने प्रत्यक्षात काय होते ते पाहू या.

(पुढील अंकात उर्वरित भाग)

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
E mail;: yrsane@eth.net

●●●

## कॉलराग्रस्त झिम्बाबवे

झिम्बाबवे मध्ये जणू काही आहेत ते प्रश्न कमी आहेत म्हणून कॉलराच्या समस्येने त्यात भर टाकली आहे. अकल्पित अशा कॉलराच्या प्रसाराचा प्रश्न सध्या झिम्बाबवे मध्ये तीव्र बनला आहे. याचे कारण प्रामुख्याने खालावत जाणारी जीवन प्रद्धती हे आहे.

या देशात ९००० जण या रोगाने ग्रस्त असल्याचा कयास तेथील प्रसारमाध्यमाने केला आहे. ३६६ जणांचा या रोगामुळे अलिकडे मृत्यू झाला आहे. तेथील आरोग्य खात्याने 'न भूतो न भविष्यती' असा हा उद्रेक असल्याचे म्हटले आहे. देशाच्या काही ग्रामीण भागात तर हा स्थानिक प्रश्न आहेच पण अता राजधानी हरारे सारख्या शहरातही हा रोग पसरत आहे. यापूर्वी १९९२ मध्ये असा मोठा प्रसार झाला होता व ३००० रुग्णांमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव आढळला होता.

**न्यू सायंटिस्ट २९ नोव्हें २००८,**
**आधारित**

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***
***२५४२६२७०***

# निखळलेले तारे २००८

*'मृत्यू' हे अटळ सत्य आहे. कालप्रवाहात अनेकजण येतात / जातात. पण आपल्या कर्तृत्वाने आपल्या क्षेत्रात काही वेगळे करणारी नावे मनात रहातात. अशांपैकी काही मृत्यूंची ही नोंद. अशी नोंद परिपूर्ण नसते. तरीही संकलकाचा हा प्रयत्न उल्लेखनीय आहे. या नोंदींकडे एक प्रयत्न म्हणूनच पहावे - संपादक*

'अयोग्य: पुरुष: नास्ति' या उक्तीप्रमाणे प्रत्येक मनुष्य प्राण्याचे जीवन कोणत्या ना कोणत्या गुणांने संपन्न झालेले आढळून येते. अशा व्यक्तीच्या निधनाने त्याच्यातील तो गुण झाकोळून जातो. अशा वेळी त्या व्यक्तींची नोंद घेऊन त्या गुणाला उजाळा द्यावा व तो गुण आत्मसात करू इच्छिणाऱ्याला अंशत: साहाय्यभूत ठरावे, या भूमिकेतून प्रस्तुत संकलनाचा प्रयत्न केला आहे.

इ. स. २००८ या वर्षात विविध क्षेत्रांतील अशा निखळलेल्या ताऱ्यांची नोंद करण्यात आली आहे. निवड फक्त मराठी नावांची केली आहे. अपघात, घातपात, आत्महत्या व हत्या यामुळे मृत्यू पावलेल्यांना वगळले आहे. मानवी कार्यशक्तीच्या मर्यादा लक्षात घेता, अनवधानाने काही उल्लेख राहून गेले असल्याची शक्यता आहे.

**नोंदीचे स्वरूप :**

प्रथम आडनाव, मग व्यक्ती नाम व नंतर मधले नाव. व्यक्ती जर इतर नावाने परिचित असेल, अथवा टोपणनाव धारण केलेली असेल तर ते नाव पुढे कंसात दिले आहे. नंतरच्या कंसात व्यक्तीचे मृत्यू समयीचे वय व त्याच्या पुढील कंसात व्यक्तीचा जन्म दिनांक (उपलब्ध असल्यास) आणि मृत्यू दिनांक. शेवटी व्यक्तीचे कार्यक्षेत्र नमूद केले आहे. सर्व नोंदी विषयवार वर्गीकृत करून दशांश वर्गीकरणाच्या १९ व्या आवृत्तीनुसार लावल्या आहे. प्रत्येक विषयातील नोंदी या मराठी वर्णक्रम नियमावली नुसार (दिशा डिसें. २००८ चा अंक) केल्या आहेत.

सर्व नोंदी पुढील दहा विषयांत समाविष्ट केल्या आहेत.

१) पत्रकारिता (०७०) २) हिंदू संत (२९४.५६)

३) सामाजिक क्षेत्र (३००) ४) ज्येष्ठ नागरिक (३०५.२६)

५) राज्यशास्त्र (३२०) ६) कायदा (३४०)

७) शिक्षण क्षेत्र (३७०) ८) कला (७००)

९) क्रीडा (७९६) १०) साहित्य (८९१.४६)

दशांश वर्गीकरण पद्धतीतील अनेक विषय या यादीत नाहीत याची जाणीव आहे.

अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी व जिज्ञासू वाचक यांना प्रस्तुत संकलनाचा निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास वाटतो. दै. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता व सकाळ या वृत्तपत्रांतील बातम्या हा या सूचीचा आधार आहे - **संकलक**.

**◈ पत्रकारिता (०७०) :**

१) कुलकर्णी, दत्तात्रेय (८२) (मृत्यू : ४/५/०८), दिल्ली आकाशवाणीचे निवृत्त मराठी वृत्तविभाग प्रमुख.

२) घोडे, नथुराम लक्ष्मण (७७) (मृत्यू : ९/३/०८), दापोलीतील ज्येष्ठ पत्रकार

३) जोशी, मधुकर दत्तात्रेय (७६) (मृत्यू : १/८/०८), पुणे पत्रकारनगरचे संस्थापक

४) थोरात, महादेव रामचंद्र (६८) (मृत्यू : ३१/७/०८), 'बॉम्बे पब्लिसिटी' चे माजी व्यवस्थापक

५) दीक्षित, दिगंबर भास्कर (राजाभाऊ) (७४) (मृत्यू: ११/१/०८), चिपळूणचे ज्येष्ठ पत्रकार.

६) देशमुख, प्रकाश (५८) (मृत्यू : १७/५/०८), 'सकाळ' चे माजी मुख्य वार्ताहर

७) फडके, राजेंद्र (४२) (मृत्यू: २९/३/०८), 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये उपसंपादक

८) म्हात्रे, नीरा (मृत्यू : १२/१०/०८), 'साप्ता. कुष्ठमित्र' च्या संपादिका

९) मयेकर, दिलीप (५३) (मृत्यू : १५/२/०८), पत्रकार व प्राध्यापक

१०) शेट्ये, आत्माराम (७६) (मृत्यू : १४/८/०८), 'लोकसत्ता' चे माजी वृत्तसंपादक.

११) सांगळे, प्रफुल्ल (५९) (मृत्यू : १८/३/०८), मंत्रालय वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष.

### ◈ हिंदू संत (२९४.५६) :

१) पाटणकर, श्रीपत गणपती (गगनगिरी महाराज) (१०३) (जन्म : १९०५ - मृत्यू : ४/२/०८), विज्ञाननिष्ठ अध्यात्माचा प्रसार करणारे नाथ संप्रदायातील श्रेष्ठ हठयोगी संत.

२) भोसले, रामचंद्र मारुती (काका) (७२) (मृत्यू : २८/७/०८), अक्कलकोट स्वामी महाराजांच्या शिष्य परंपरेतील सहावे वारस अधिकारी.

### ◈ सामाजिक क्षेत्रे (३००) :

१) आमटे, मुरलीधर देवीदास (बाबा) (जन्म : २६/१२/१९१४ - मृत्यू : ९/२/०८), कुष्ठरोग निर्मूलनातील अग्रणी.

२) कासारे, वैशाली (४५) (मृत्यू : २/५/०८), 'एकता' चळवळीतील कार्यकर्ती

३) ढाकेफळकर, संजीवनी (९६) (मृत्यू : २७/२/०८), ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व सामाजिक कार्यकर्त्या

४) धनेश्वर, जयश्री (८३) (मृत्यू : २९/११/०८), शिवाजी पार्क, दादर येथील सामाजिक कार्यकर्त्या.

५) पवार, शांताबाई शिवरामपंत (८४) (मृत्यू : ३०/११/०८), सामाजिक कार्यकर्त्या.

६) भापकर, सावित्रीबाई मोहनराव (६५) (मृत्यू : १/५/०८), बारामती येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या.

७) शिंदे, केशव बुधाजी (८४) (मृत्यू : १७/५/०८), वाडा तालुक्यातील बिलघर येथील समाजसेवक.

८) शिंदे, महादेव (गुरूजी) (९३) (मृत्यू : १९/२/०८), सामाजिक कार्यकर्ते.

९) सहस्त्रबुद्धे, सुधा प्रभाकर (७९) (मृत्यू : ३/३/०८), संघ परिवारातील राष्ट्र सेविका समितीच्या सदस्या.

१०) संत, द. अ. (७१) (मृत्यू : १४/७/०८), कल्याण येथील सदिच्छा अपंग पुनर्वसन केंद्राचे संस्थापक.

११) साबळे, विश्वास बाळकृष्ण (मामा) (८०) (मृत्यू : १०/१२/०८), पोलादपूर येथील ग्रामदैवत मंडळाचे मार्गदर्शक.

१२) साळवे, मारूती दौलतराव (७३) (मृत्यू: ०२/१२/०८), पारनेर तालुक्यातील कान्हुरपठार येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते.

१३) हिंदळेकर, र. गो. (७३) (मृत्यू : २४/२/०८), डोंबिवली भंडारी मंडळाचे संस्थापक - अध्यक्ष.

◈ **ज्येष्ठ नागरिक (३०५.२६) :**

१) कुलकर्णी, पी. डी. (८५) (मृत्यू : १२/१/०८), संयुक्त राष्ट्र संघाचे माजी सल्लागार.

२) कुलकर्णी, मनोहर आप्पाजी (८२) (मृत्यू : २१/०९/०८), कल्याण येथील 'पेन्शनर्स असोसिएशन' चे अध्यक्ष.

३) घोंगटे, राजारामबापू (७१) (मृत्यू : १३/१०/०८), गाडगेबाबा मिशनचे मुंबई विभाग अध्यक्ष.

४) जगताप, निवासराव सखाराम (९०) (मृत्यू : ०७/०५/०८), स्वातंत्र्यसैनिक.

५) जोशी, सिंधुताई (९२) (मृत्यू : १८/७/०८), मतिमंदांसाठी कार्य.

६) दाते, कृष्ण रामचंद्र (८२) (मृत्यू : २८/९/०८), ज्येष्ठ पर्यावरण व जलसिंचन तज्ज्ञ.

७) नाईक, मुकुंद गोविंद (८७) (मृत्यू : १४/३/०८), सातपाटी येथील स्वातंत्र्यसैनिक.

८) प्रभुदेसाई, वामनराव (८०) (मृत्यू : १७/८/०८), यशस्वी उद्योजक.

९) परळकर, माधवराव (८२) (मृत्यू : २४/२/०८), राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक.

१०) पाटील, शंकरबुवा (९७) (मृत्यू : २९/११/०८), घणसोली गावातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक.

११) म्हात्रे, नामदेव (८४) (मृत्यू : ४/२/०८), गोवामुक्ती आंदोलनातील स्वातंत्र्यसैनिक.

१२) मराठे, शरदच्चंद्र श्रीपाद (८५) (मृत्यू : २८/९/०८), माजी केंद्रीय उद्योग सचिव.

◈ **राज्यशास्त्र (३२०) :**

१) कदम, महेंद्र कानिफा (३५) (मृत्यू : १२/१/०८), दलित चळवळीतील कार्यकर्ते.

२) काळे, विश्वनाथ (६३) (मृत्यू : १२/५/०८), एल. आय. सी. कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे संस्थापक - सदस्य.

३) कुलकर्णी, राजाभाऊ (९१) (मृत्यू ; ३०/३/०८), माजी खासदार.

४) गायकवाड, दगडूमायप्पा (५८) (मृत्यू : २५/६/०८), भारतीय दलित पँथरचे नेते.

५) घारे, श्रीपाद श्रीधर (९९) (मृत्यू : २५/२/०८), पिंपरी - चिंचवडचे प्रथम नगराध्यक्ष

६) ठिपसे, महादेव दिगंबर (८६) (मृत्यू : १५/५/०८), शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक - सदस्य

७) देशपांडे, जगदीश नारायण (६२) (मृयू : १२/१/०८), ज्येष्ठ समाजवादी नेते

८) देशपांडे, निर्मलाताई (७९) (मृत्यू : १/५/०८), माजी राज्यसभा सदस्या.

९) देशमुख, त्र्यंबक गोपाळ (८५) (जन्म : १२/८/१९२३ - मृत्यू : ४/१२/०८), माजी मंत्री

१०) नाखवा, नीला (८३) (मृत्यू : २०/९/०८), ठाण्याच्या माजी नगरसेविका.

११) नागदकर, नारायण गिरमाजी (अप्पासाहेब) (८७) (जन्म : १६/११/१९२० - मृत्यू : १८/४/०८), माजी आमदार.

१२) पाटील, अनंतराव (८७) (जन्म : २२/११/१९२१ - मृत्यू : १६/४/०८), माजी खासदार.

१३) पाटील तुकाराम लक्ष्मण (५९) (मृत्यू : ३०/४/

०८), पालघर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस.

१४) पाटील, पांडुरंग दादासाहेब (९१) (मृत्यू : १७/९/०८), कऱ्हाडचे नगरराध्यक्ष

१५) बोऱ्हाडे, टी. एस. (७२) (मृत्यू : २३/३/०८), कामगार क्षेत्रातील नेते.

१६) रांगणेकर, पांडुरंग भा. (९५) (मृत्यू : ८/२/०८), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते.

१७) वर्तक, ताराबाई (८२) (मृत्यू : ७/३/०८), माजी राज्यमंत्री.

१८) वैद्य, रघुनाथ (मामा) (९२) (मृत्यू : ७/३/०८), ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक.

१९) सूर्यवंशी, भगवानराव (८३) (मृत्यू : २०/३/०८), शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार.

◈ **कायदा (३४०) :**

१) देशपांडे, श्रीकांत (५९) (मृत्यू : १३/५/०८), सर्वोच्च न्यायालयातील महाराष्ट्राचे वकील.

२) वालावलकर, विनायक (८९) (मृत्यू : १/९/०८), सत्र न्यायालयाचे माजी न्यायाधीश.

◈ **शिक्षण (३७०) :**

१) अमृते, गणेश रामचंद्र (अप्पा) (९५) (मृत्यू : २८/१/०८), बोर्डी येथील सु.पे.ह. हायस्कूलचे माजी शिक्षक.

२) कोठूरकर, वासुदेव कृष्ण (९७) (मृत्यू : ५/११/०८), प्राध्यापक व मानसशास्त्रज्ञ.

३) गुळे, बी.आर. (५४) (मृत्यू : २/१/०८), मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण संघाचे संस्थापक सदस्य.

४) चौधरी, भानू (८३) (मृत्यू : १७/२/०८), प्राध्यापक व साहित्यिक.

५) निकम, गोविंदराव (७३) (मृत्यू : २४/१/०८), शिक्षणसम्राट व सहकारमहर्षी.

६) रानडे, रघुनाथ विष्णू (८३) (मृत्यू : १०/६/०८), राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक.

◈ **कला (७००) :**

१) आडिवरेकर, गोपाळ (७०) (जन्म : १९३८ - मृत्यू : २९/९/२००८), ज्येष्ठ चित्रकार.

२) केंकरे, दामू (८०) (जन्म : १९२८ - मृत्यू : २८/९/०८), नेपथ्यकार व नाट्यदिग्दर्शक.

३) गडकर, जयश्री (६६) (जन्म : २१/२/१९४२ - मृत्यू : २९/८/०८), चित्रपट अभिनेत्री.

४) जोशी, सदानंद (८६) (मृत्यू : १२/११/०८), नकलाकार.

५) थोरात, महादेव (६८) (मृत्यू : ३१/७/०८), 'बॉम्बे फिल्म पब्लिसिटी' चे माजी व्यवस्थापक.

६) नायक, विहंग विष्णुराज (६४) (मृत्यू : ९/६/०८), नाट्य व दूरदर्शन कलावंत.

७) पाटील, गणपत (८९) (मृत्यू : २३/३/०८), सिने कलावंत.

८) पाध्ये, बाळकृष्ण यज्ञेश्वर (८८) (जन्म : १०/१२/१९२० - मृत्यू : १२/५/०८), जाहिरात क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व.

९) पुजारी, दशरथ (७९) (मृत्यू : १३/४/२००८), संगीतकार व गायक.

१०) मारूलकर, दत्तात्रेय कृष्णाजी (दत्ता) (७३) (मृत्यू

: १२/२/०८), अभिनेते.

११) राजोपाध्ये, वसंतराव (९४) (जन्म : २८/११/१९१३ - मृत्यू : ४/१२/२००८), ज्येष्ठ गायक व समीक्षक.

१२) वनमाळी, पांडुरंग गणपत (७७) (मृत्यू : २५/७/०८), शाहीर, लोकसंगीतकार.

◈ **क्रीडा (७९६) :**

१) नागवेकर, कमलाकर (६१) (मृत्यू : १/८/०८), भारताचे माजी क्रिकेटपटू.

२) पवार, विष्णु दगडू (७८) (जन्म : १९२० - मृत्यू : १३/५/२००८), पहिलवान.

३) पंत, भ. मा. (८३) (मृत्यू : ७/८/२००८), क्रीडातज्ज्ञ.

४) मंकड, अशोक (६१) (मृत्यू : १/८/०८), भारताचे माजी क्रिकेटपटू.

◈ **साहित्य (८९१ - ४६) :**

१) इनामदार, कल्याण (६९) (मृत्यू : १४/७/०८), ज्येष्ठ कवी.

२) कवीश्वर, ग. वा. (९६) (मृत्यू : २४/७/०८), थोर दार्शनिक व अभ्यासू लेखक.

३) गाडगीळ, गंगाधर (८७) (जन्म : २५/८/१९२३ - मृत्यू : १५/१०/२००८), ज्येष्ठ मराठी साहित्यिक व अर्थतज्ज्ञ.

४) गाडगीळ, सदाशिव रामचंद्र (९३) (मृत्यू : ९/१०/०८), ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक.

५) जोशी, र. कृ. (७२) (मृत्यू : ५/२/०८), सुलेखनकार, लिपीतज्ज्ञ.

६) डोळके, सुरेश महादेव (८२) (जन्म : २१/९/१९२६ - मृत्यू : २७/१/०८), धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक व चतुरस्त्र लेखक.

७) देऊळगावकर, वि. पां. (भाऊसाहेब) (९५) (मृत्यू : २५/२/२००८), ज्येष्ठ साहित्यिक.

८) धारप, नारायण गोपाळ (८३) (जन्म : २७/८/१९२५ - मृत्यू : १८/८/२००८), भयकथा लेखक.

९) पिंगे, रवींद्रनाथ रामचंद्र (रवींद्र) (८२) (जन्म : १३/३/१९२६ - मृत्यू : १८/१०/२००८), प्रसिद्ध ललित लेखक.

१०) फडके, यशवंत दिनकर (७६) (जन्म : ३/१/१९३१ - मृत्यू : ११/१/२००८), साक्षेपी अभ्यासक व आधुनिक महाराष्ट्राचे इतिहास लेखक.

११) बाबर, सरोजिनी कृष्णराव (८६) (जन्म : ७/१/१९२२ - मृत्यू : २०/४/२००८), लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासक व लेखिका.

१२) बागूल, बाबुराव रामजी (७७) (जन्म : १७/७/१९३० - मृत्यू : २६/३/२००८), दलित लेखक.

१३) महाम्बरे, गंगाधर मनमोहन (७७) (जन्म : ३१/१/१९३१ - मृत्यू : २२/१२/२००८), ज्येष्ठ कवी.

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल

स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
आयरे मार्ग, दत्तनगर,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८

●●●

# स्वार्थ

*स्वार्थ कुणालाही चुकला नाही असे म्हणतात. या स्वार्थाच्या संदर्भात काही विचार मांडून विचार प्रवृत्त करू पाहणारा हा लेख - संपादक*

आज अनेक व्यक्ती आशा आहेत की त्या स्वार्थाशिवाय विचार करताना दिसून येत नाहीत. माझा स्वार्थ कशात आहे, दुसऱ्याने माझ्यासाठी काही केले नाही मग मी त्यांचा कशाला विचार करू? अमूक एखादी गोष्ट केल्यानंतर माझा काय फायदा होईल? यापलिकडे जाऊन ते विचारच करीत नाहीत. सगळीकडे दिसतो तो केवळ स्वार्थ, स्वार्थ आणि स्वार्थच ---. म्हणून आज संपूर्ण जगच स्वार्थाने बरबटलेले आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. आई - वडिल मुलावर प्रेम करतात किंवा मुलगा आई - वडिलांवर प्रेम करतो ते केवळ स्वार्थासाठीच. कारण एकमेकांना एक दुसऱ्याकडून काहीतरी हवे असते, त्यांच्याकडून काहीतरी अपेक्षा असतात. पती - पत्नी एकमेकांवर प्रेम करतात, तेही केवळ स्वार्थापोटीच. पत्नीला जे हवे ते दिले किंवा तिच्या अपेक्षा पूर्ण केल्या तरच ती पतीवर प्रेम करेल, त्यांचा आदर करेल. जर तिच्या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीतर ती पतीवर प्रेम करणार नाही. मग घरात वाद-विवाद, भांडण, क्लेश निर्माण झाल्याचे दिसून येतात. ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील वस्तुस्थिती आहे. पतीचेही असेच असते. पतीने पत्नीला पाणी मागितल्यानंतर पत्नीने ताबडतोब पाणी दिले, तर पत्नी चांगली असा पतीच्या मनात समज होतो. पुन्हा जर थोड्यावेळाने एखादी गोष्ट ऐकण्यास तिने दुर्लक्ष केले तर लगेच पती वाईट अशी भावना मनात येते. म्हणजेच पाच मिनिटापूर्वी चांगली वाटणारी पत्नी लगेच थोड्यावेळाने वाईट वाटू लागते. कारण काय तर त्यांच्या मनात असणारा स्वार्थ होय.

अगदी गरीबातील गरीब सर्वसामान्य माणसापासून ते देशातील उच्चपदस्थ व्यक्तीपर्यंत विचार केला तर सर्वजण स्वार्थाशिवाय कशाचाही विचार करीत नाहती. स्वार्थी माणसांना केवळ स्वार्थच दिसत असतो. दुकानदार दुधात भेसळ करून दूध विकतात, कार्यालयात लाच घेऊन कामे केली जातात, मोठमोठ्या औषध कंपन्या औषधांमध्ये भेसळ करतात, लहान / मोठे व्यवसायिक अधिक नफा मिळावा म्हणून प्रयत्न करीत असतात. मग त्यासाठी त्यांची वाटेल ते करण्याची तयारी असते. दररोज मारामाऱ्या, दरोडे पडतात, यापाठीही व्यक्तीचा स्वार्थच लपलेला असतो. कारण माणसांना हवा असतो आनंद, सुख आणि समाधान. एवढेच काय अगदी देशपातळीवर विचार केला तर आपणास असे दिसून येते की, एक देश दुसऱ्या देशावर आक्रमण करण्यासाठी करोडो रूपये खर्च करतो. त्यासाठी अहोरात्र हजारो शास्त्रज्ञ कार्यरत असतात. हे कशासाठी तर केवळ आपल्या संरक्षणासाठी, सुखासाठी, इतर व्यक्तींचा नाश करण्यासाठी, त्यांना मारण्यासाठी. पण या जगात कित्येक रोगांवर औषधे नाहीत. त्या वाचून लाखो लोक मृत्यूमुखी पडतात. अशा रोगावरील उपचारासाठी लागणारे औषध तयार करण्यसाठी एवढे शास्त्रज्ञ काम करीत नाहीत किंवा एवढा पैसा खर्च केला जात नाही. म्हणजेच, जेवढा खर्च माणसे मारण्यावर खर्च केला जातो तेवढा खर्च माणसांचा जीव वाचवण्यासाठी केला जात नाही. आपल्या कल्याणासाठी, आपल्या संरक्षणासाठी जरूर प्रयत्न करायला हवेत पण त्याचबरोबर इतरांचेही कल्याण झाले पाहिजे. दुसऱ्यांना मारून आपण सुखी होत नाही किंवा आपले हित होत नाही. उलट आपल्या पदरी पापच पडते. हा विचार करायला हवा. म्हणून स्वत:मध्ये काही बदल घडवून आणले पाहिजेत. त्यासाठी थोडे कष्ट पडले तरी

चालतील. आपण इतरांच्या मदतीला धावून गेलो तर दुसरी व्यक्ती आपल्या मदतीला धावून येईल. जसे आपल्याला संकटसमयी कोणी तरी मदत करावी असे वाटते तसे इतरांनाही वाटत असते. म्हणून, केवळ स्वार्थ न पहाता इतरांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आपण एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे 'जो स्वत:साठी जगतो तो केव्हाच मेलेला असतो.

'स्वार्थ' हा कोणालाही चुकलेला नाही आणि चुकणारही नाही. पण आपण त्यामध्ये थोडा बदल जरूर करू शकतो. प्रत्येक व्यक्तीने स्वार्थ पहावा. परंतु त्या स्वार्थाची मर्यादा थोडी वाढवायला हवी. आपण स्वत:चा स्वार्थ न पहाता कुटुंबाचा स्वार्थ पहावा, समाजाचा स्वार्थ साधत असेल तर तालुक्याचा स्वार्थ पहावा, तालुक्याचा स्वार्थ साधत असेल तर जिल्ह्याचा स्वार्थ पहावा आणि अशा प्रकारे प्रदेश, देश आणि संपूर्ण जगाचा स्वार्थ पहावा. अशा पद्धतीचा विचार करून आपण ज्यावेळी परतीच्या मार्गावर लागतो त्यावेळी आपल्या लक्षात एक गोष्ट लक्षात येईल ती म्हणजे ज्यावेळी जगाचा स्वार्थ साधलेला असेल त्यावेळी सर्व राष्ट्रांचाही स्वार्थ साधलेला असेल, राष्ट्रांचा स्वार्थ साधलेला असेल त्यावेळी जिल्ह्यांचाही स्वार्थ साधलेला दिसून येईल, जिल्ह्याचा स्वार्थ साधलेला असेल त्यावेळी तालुक्याचा स्वार्थही साधलेला असेल त्याच प्रमाणे आपोआप जात, समाज, कुटुंब आणि त्या कुटुंबामध्ये स्वत:चाही स्वार्थ साधलेला आपणास दिसून येईल. म्हणून प्रत्येक व्यक्तीने स्वार्थ पहात असताना केवळ स्वत:चा स्वार्थ न पहाता त्या स्वार्थाची मर्यादा वाढवायला हवी. व्यक्ती स्वार्थाची मर्यादा केव्हा वाढवेल तर तिला स्वार्थ या शब्दामधील 'स्व' ची ओळख होईल त्यावेळी. मी कोण आहे? या जगात माझे अस्तित्व काय? याची व्यक्तीस जोपर्यंत ओळख होत नाही तोपर्यंत स्वार्थ सुटणे शक्य नाही, एखाद्या व्यक्तीस तू कोण आहेस? असा प्रश्न विचारला तर ती व्यक्ती लगेच उत्तर देईल की, मी माणूस आहे, दुसरी व्यक्ती म्हणेल मी हिंदू, बौद्ध, शिख किंवा ख्रिश्चन आहे. कोणी म्हणेल मी सुतार आहे, कोणी म्हणेल मंत्री आहे तर कोणी म्हणेल शेतकरी आहे. अशा प्रकारची अनेक उत्तरे आपल्यासमोर येतील. परंतु ही त्या व्यक्तीची खरी ओळख नसून ती ओळख व्यावसायिक ओळख असते. जोपर्यंत व्यक्तीस मी परमपिता परमात्म्याचा एक अंश आहे, माझे या जगात काहीही अस्तित्व नाही, माझे शरीर म्हणजे आत्म्याद्वारे चालविण्यात येणारे एक साधन आहे आणि हे साधन नाशवंत आहे. आत्मा हे शरीर केव्हा सोडून देईल याचा भरवसा नाही. जीवन म्हणजे हवेने भरलेला फुगा आहे आणि हा फुगा केव्हा फुटेल याचा नेम नाही. म्हणून सर्वप्रथम आपण एक गोष्ट करायला हवी ती म्हणजे मी, माझे, मला या शब्दांना मुळापासून नष्ट केले पाहिजे. याशिवाय आपला आणि पर्यायाने देशाचा विकास होणे शक्य नाही. म्हणून आज विद्यार्थी दशेतच मुलांना अशा प्रकारची शिकवण देणे गरजेचे आहे.

**श्री. यशवंत माने**

अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●



# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ९ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरे झाले. पालकांचा प्रचंड प्रतिसाद या संमेलनाला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. करंदीकर सर होते. कार्यक्रमाची सुरुवात २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून झाली. या कार्यक्रमाला प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिक सौ. विजया भंडारे व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर उपस्थित होत्या. या कार्यक्रमाची प्रमुख पाहुणी कु. स्वराली यतीन चोडणेकर होती. या सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार पवित्र असे तुळशीचे रोप देऊन करण्यात आला. कु. स्वराली ही इ. ३ री, पद्माकर ढमढेरे हायस्कूलमध्ये शिकते. स्वरालीने गायन, चित्रकला, वक्तृत्व या सर्व कलांत मिळवलेले यश वाखाणण्यासारखे आहे. आजपर्यंत तिला ८६ पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. ती अभ्यासातही तेवढीच हुशार आहे. अशा ह्या छोट्या




**कला चिल्ड्रेन ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धेत शाळेतील २४ मुलांना सुवर्णपदक व प्रशस्तिपत्रक मिळाली.**




**वार्षिक स्नेहसंमेलन २००८-२००९ 'पाऊस' या विषयावर गाणे सादर करताना मोठ्या शिशुचे विद्यार्थी**

पाहुणीचा परिचय मोठ्या शिशुतील कु. प्रथमेश शेळके व कु. स्वप्नील गायकवाड या लहान मुलांनी तिची मुलाखत घेऊन सर्वांना करून दिला. नंतर चिल्ड्रेन कला ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धेत २४ मुलांना सुवर्ण पदके व प्रशस्तिपत्रके मिळाली. तसेच शाळेला Active School Award व ट्रॉफी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांना Active Principal Award मिळाले. क्रीडास्पर्धेतील विविध बक्षिसे मिळालेल्या मुलांचा कु. स्वराली व श्री. करंदीकर सर ह्यांच्या हस्ते बक्षिसे देऊन पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम पार पडला. नंतर ज्या कार्यक्रमाची मुले व पालक वर्ग उत्सुकतेने वाट पहात होते त्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वर्षीचा विषय होता 'पाऊस'. यात अगदी बालपणापासून ऐकलेली गाणी - सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय, नाच रे मोरा, पिरपिर पिरपिर पावसाची ते अलिकडील अग्गोबाई ऽऽऽ ढग्गोबाई अशी लहान मुलांची पावसावरील गाणी अत्यंत सुंदररित्या लहान व मोठ्या शिशुने सादर केली. या मनमोहक कार्यक्रमाची सागंता लहान शिशुतील कु. योगिनी जोडे ह्या मुलीने सादर केलेल्या पसायदानाने झाली.

**वृत्त संकलन -सौ. विदुला वैद्य**

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभाग, ठाणे

**वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ :**

गुरूवार दि. ८ जानेवारी रोजी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन खूप उत्साहात व दिमाखात संपन्न झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून माननीय श्रीमती कुमुदिनी बल्लाळ यांना आमंत्रित केले होते. तर अध्यक्षस्थान माननीय श्री. श्री. वि. करंदीकर यांनी भूषविले. वि. प्र. मंडळाचे ज्येष्ठ सभासद मा. श्री. मा. ना. पाटील, पूर्व प्रा. विभागाच्या विभाग प्रमुख मा. सौ. विदुला वैद्य व आमच्या विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे इ. मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.




**वार्षिक स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुण्या - मार्गदर्शन करताना श्रीमती कुमुदिनी बल्लाळ - महाराष्ट्र शिक्षण परिषद अध्यक्षा,**
**व्यासपीठावरील मान्यवर - कार्यक्रमाचे अध्यक्ष - वि. प्र. मं. जेष्ठ सदस्य मा. श्री. श्री. वि. करंदीकर, मा. श्री. पाटील साहेब, मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे, पू. प्रा. प्रमुख सौ. विदुला वैद्य**

भारतीय परंपरेनुसार दीप प्रज्वलन करून ईशस्तवनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. इ. ४ थीतील आकाश वाघ या विद्यार्थ्याने या कार्यक्रमाचे संयोजन उत्कृष्टरित्या केले. प्रास्तविक मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे यांनी केले. अहवाल वाचन सौ. स्मिता शास्त्री, बक्षिसाची यादी वाचन सौ. स्नेहल कुडव व सौ. उर्मिला परदेशी, ऋणनिर्देशाचे काम सौ. ललिता फिरके यांनी केले.

इ. १ ली ते इ. ४ थी वार्षिक परीक्षा २००८ यातील सर्वप्रथम व तुकडीतील प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मा. श्रीमती कुमुदिनी बल्लाळ यांनी आपल्या शुभहस्ते बक्षिस देऊन त्यांचे कौतुक केले. पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा सत्कार व शिष्यवृत्ती वर्गाला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा सत्कार अध्यक्ष मा. करंदीकर सर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यानंतर 'नृत्य गणेश' हा सांस्कृतिक कार्यक्रम इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी सादर केला. या कार्यक्रमाचे संयोजन सौ. मीना सोनावणे यांनी अतिशय खुमासदार शैलीत केले. विद्यार्थ्यांनी अतिशय नयनरम्य, मनोहारी असे नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली. नृत्यातील काही अदा बघून अक्षरश: डोळ्यांचे पारणे फिटले. या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना व मार्गदर्शन मुख्याध्यापिका सौ.विजया भंडारे यांची होती.

**क्रीडा महोत्सव :**

इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. लिंबू चमचा, बेडूक उड्या, पायात चेंडू घेऊन धावणे इ. स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके १० जानेवारी रोजी देण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या मा. सौ. मंजिरी दांडेकर या लाभल्या होत्या. तर अध्यक्षस्थान मुख्याध्यापिका मा. सौ. विजया भंडारे यांनी भूषविले. शाळेच्या शारदोत्सवाच्या वेळी घेण्यात आलेल्या विविध गुणदर्शन स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांनाही बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. बालदिनानिमित्त 'पंडित नेहरूंच्या जीवनातील प्रसंग' ही निबंध स्पर्धा घेतली होती. यातील विजेती विद्यार्थिनी कु. भक्ती गुरव (इ. ४ थी २) हिचे बक्षीस देऊन कौतुक केले.



**क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना बक्षिसे देताना प्रमुख पाहुण्या सौ. मंजिरी दांडेकर व मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे**

शिक्षकांच्या प्रशिक्षण काळात ज्या पालकांनी वर्ग घेऊन मोलाची अशी मदत शाळेला केली त्या पालकांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

**अल्पोपहार :**

शाळेच्या स्नेहसंमेलनानिमित्त २१ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

या उपक्रमांकरिता सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, संगणक विभागातील शिक्षक, आंतरवासिता शिक्षक यांनी खूप मेहनत घेतली व कार्यक्रम यशस्वी केले. कुशल नियोजन व मार्गदर्शन मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे यांचे होते.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यामिक विभाग

❖ **स्नेहसंमेलन :**

२००८ - ०९ या शालेय वर्षाचे स्नेहसंमेलन ६ व ७ जाने. रोजी संपन्न झाले. यात

**इ. ८, ९, १० वी**

प्रथम क्रमांक - हम होंगे हिंदुस्थानी (१० क, ड)

द्वितीय क्रमांक - आई भवानी (९ क)

(विभागून) - मोरया मोरया (१० ब)

उत्तेजनार्थ - हम सब एक है। (१० अ)

(विभागून) - रिंद पोश माल (९ अ)

**इ. ५, ६, ७ वी**

प्रथम क्रमांक - शेपटीवाल्या प्राण्यांची (६ इ)

द्वितीय क्रमांक - बम बम बोले ( ६ ब)

(विभागून) - गणेश वंदना (६ क)

उत्तेजनार्थ - मला वाटते पंख मिळावे (५ क)

(विभागून) - रंगिलो मारो ढोलना ( ७ ब)

❖ **संस्कृत गीतगायन :**

'दिन दयाळ प्रेरणा केंद्र' या संस्थेतर्फे झालेल्या 'संस्कृत गीतगायन' स्पर्धेत इ. ९ ब च्या ९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

❖ **श्लोकपठण :**

सुरवाणी ज्ञानमंदिरातर्फे घेण्यात आलेल्या संस्कृत श्लोक पठण स्पर्धेत प्रणिता काळभोर (६ अ) हीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

❖ **विज्ञानमंच :**

राज्य विज्ञान शिक्षणसंस्था रविनगर, नागपूर यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या विज्ञानमंच प्रवेशपूर्व परीक्षेतून प्रफुल्ल खेडेकर व मृण्मय कोथळे यांची विज्ञानमंच शिबीरासाठी निवड झाली. दि. ३ ते ९ जाने. या कालावधीत कंचन हायस्कूल, नालासोपारा येथे झालेल्या शिबीरास ते उपस्थित होते.

या शिबीरात विज्ञान शिक्षिका सौ. अडसुळे यांनी 'आपला आहार व विज्ञान' या विषयावर व्याख्यान दिले.

### ❖ चित्रकला स्पर्धा :

औद्योगिक सुरक्षा संचालनालय व 'मार्ग' आयोजित चित्रकला स्पर्धेत नम्रता शर्मा (९ अ) हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिकाचे स्वरूप चषक, प्रमाणपत्र व रु. १०००/- असे आहे. उत्तेजनार्थ पारितोषिक तनिषा देसाई (८ अ) हिला प्राप्त झाले.

अभिमान प्रतिष्ठान आयोजित चित्रकला स्पर्धेत मृण्मयी कोळी (९ अ) हिला द्वितीय क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले.

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विद्यालय आणि ट्रान्सपोर्ट ट्रॅव्हल विंग आयोजित रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत प्रणाली पिंगळे (९ अ) हिला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

### ❖ ज्युडो :

२००८ अखेर परभणी येथे झालेल्या ज्युडो स्पर्धेत श्यामला यादव (५ इ) हिला सुवर्णपदक प्राप्त झाले.

International Institute of Meditative Martial Arts यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या Keimoudo या प्रकारात शुभम जामसुतकर (५ इ) यास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

### ❖ लोकनृत्य स्पर्धा :

'श्री माँ विद्यालया' तर्फे आयोजित केलेल्या लोकनृत्य स्पर्धेत सादर केलेल्या नृत्यास रु. १०००/-, चषक व प्रमाणपत्राच्या स्वरूपात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले तसेच प्रिया टिपाले (८ ब) हिला उत्कृष्ट नृत्याचे पारितोषिक प्राप्त झाले.

### ❖ क्रिकेट :

२६ नोव्हें. रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ घेण्यात आलेल्या 'मुंबई हिरोज ट्रॉफी' मध्ये १६ वर्षाखालील मुलांच्या संघाने अंतिम विजय संपादन केला. तन्मय पवार (९ ब) हा 'उत्कृष्ट कर्णधार' ठरला तर स्मित म्हात्रे (९ ब) यास 'सामनावीर' म्हणून सुवर्णपदक प्राप्त झाले.

### ❖ डाबर च्यवनप्राश :

'डाबर च्यवनप्राश' तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांची अंतिम स्पर्धेसाठी निवड झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| आदर्श कोळी | (५ इ) | स्नेहल पाटील | (६ ड) |
| संदीप पाटील | (५ ड) | शुभम बहाडकर | (८ अ) |

### ❖ पुष्परचना व रांगोळी स्पर्धा :

इनरव्हील चॅरिटी ट्रस्ट, ठाणे तर्फे घेण्यात आलेल्या पुष्परचना स्पर्धेत मृण्मयी कोळी (९ अ) हिस ट्रॉफी, प्रमाणपत्र व रु. १५०/- तर फुलांची रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे रोख रु. १०१/- व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

### ❖ शासकीय संचलन :

जिज्ञासा मिलिटरी स्कूल, ठाणे येथे प्रशिक्षण घेत असलेल्या अद्वैत पेडणेकर (६ अ) याची २६ जाने. च्या शासकीय संचलनासाठी निवड झाली.

### ❖ IPH :

१३ जाने. रोजी ऋत्विक राजपाठक या विद्यार्थ्यांचे पालक डॉ. राजपाठक व सौ. राजपाठक यांनी इ. ५ वी ते ८ वी पर्यंत ऋत्विकला शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी IPH च्या मदतीने स्वखर्चाने शिबीराचे आयोजन केले. या शिबीरात विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणी व एक

शिक्षक म्हणून त्या अडचणी कशा ओळखाव्यात, कशा सोडवाव्यात या संदर्भात सौ. मधुरा बापट, श्री. अरुण नाईक, सौ. सुरभि नाईक या IPH च्या समुपदेशकांनी शिक्षकांना अनमोल मार्गदर्शन केले.

❖ **शांतियात्रा :**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विद्यालयातर्फे माणसातील परस्पर स्नेह, प्रेम, दया, क्षमा, शांती, विश्वबंधुत्व या भावनांची जागृती करण्यासाठी आयोजित शांतियात्रेत इ. ९ वी ड, इ चे विद्यार्थी तसेच श्री. बन्ने, श्री. पांचाळ सहभागी झाले.

❖ **स्लाइड शो :**

'दिशा फाऊंडेशन' तर्फे इ. ९ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी एड्स विषयक माहितीपूर्ण स्लाइड शो दाखविण्यात आला.

❖ **खगोलशास्त्र :**

गडकरी रंगायतन येथे झालेल्या खगोलविषयक कार्यक्रमात १८ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. प्रश्नोत्तराच्या भागामध्ये डॉ. जयंत नारळीकर यांना विचारलेल्या प्रश्नांपैकी प्रगती आडकर (८ वी) हिने विचारलेल्या प्रश्नाला सर्वोत्कृष्ट प्रश्न म्हणून पारितोषिक प्राप्त झाले; तसेच डॉ. जयंत नारळीकर यांच्या हस्ते सत्कार झाला.

❖ **गणित प्रावीण्य :**

ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या गणित प्रावीण्य परीक्षेत ऋतुराज सुतार (५ अ) याची गणित प्रज्ञासाठी निवड झाली.

❖ **टि. म. वि. :**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे 'संस्कृत प्रथमा' परीक्षेत काळभोर प्रणिता १०० पैकी ९५ गुण मिळवून विशेष प्राविण्यासह यश संपादन केले.

❖ **निधी संकलन :**

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड, युनिट महाराष्ट्र, नाशिक या संस्थेच्या मदतीसाठी विद्यार्थ्यांनी रु. ८९०५/- निधी संकलित केला.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा**
**माध्यमिक विभाग**

❖ **क्रिकेट :**

१) आमच्या शाळेच्या सोळा वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाने बूस्ट कप २००९ ही आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा जिंकली त्यांनी राजा शिवाजी विद्यालय ह्या मुंबईतील एका उत्कृष्ट संघाचा ३ गडी राखून पराभव केला.

| धावसंख्या | धावा | षटके |
|---|---|---|
| राजा शिवाजी विद्यालय | २९४ | ४५ |
| आमची शाळा | २९६ ७ बळी | ४३.१ |

**वैयक्तिक धावसंख्या :**

प्रतीक जाधव - ११५ धावा, नचिकेत खातु - ७५ धावा, गंधार सूर्यवंशी - ३५ (नाबाद), केयूर छेडा - २५ धावा

२) मॉडर्न क्रिकेट अकॅडमी आयोजित बारा वर्षाखालील आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत आमच्या संघाने चांगला खेळ करून उपान्त फेरी गाठली.

पहिल्या सामन्यात आयुष गांधी याची तर दुसऱ्या सामन्यात राहुल सूर्यवंशी याची सामनावीर म्हणून निवड झाली.

❖ **होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचा निकाल - प्रयोग परीक्षा :**

खालील विद्यार्थी प्रयोग परीक्षेत उत्तीर्ण झाले आणि

मुलाखतीसाठी त्यांची निवड झाली आहे.

कु. वृषाली प्रसादे (इ. ९ वी),

कु. सन्मय आघारकर (इ. ६ वी)

## जोशी - बेडेकर महाविद्यालय

**दि. १० जानेवारी ते ९ फेब्रुवारी ०९ या कालावधीत संपन्न झालेले कार्यक्रम :**

१) दि. १० जाने. रोजी महाविद्यालयाच्या कला व वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'Career Counselling Programme' आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून ॲडव्होकेट प्रशांत पंचाक्षरी उपस्थित होते. वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी स्नातक पदवीनंतर विविध क्षेत्रात नोकरीच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याबद्दल समुपदेशन केले.

२) दि. १३ जाने. ०९ रोजी स्टाफ ॲकॅडमीतर्फे प्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ डॉ. रविराज अहिरराव यांचे वास्तुशास्त्रावर व्याख्यान झाले.

३) दि. १४ जाने. रोजी स्वामी विवेकानंदांच्या जन्मदिवसानिमित्त 'विवेकानंद स्टडी सर्कल' चे कार्यकर्ते प्रा. श्रीराम आगाशे यांचे 'युवाशक्ती' या विषयावर व्याख्यान झाले.

४) दि. १६ व १७ जाने. रोजी विश्वविद्यालय अनुदान आयोगद्वारा प्रायोजित द्विदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राचा विषय 'स्वातंन्त्र्योत्तर भारतीय साहित्य' असा होता. उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध लेखक श्री. अरुण साधू उपस्थित होते, तर बीजभाषण सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. शिवकुमार मिश्र यांनी केले. डॉ. गिरीश जानी, डॉ. सूर्यनारायण रणसुभे, डॉ. रमणिका गुप्ता, डॉ. घोष, डॉ. भारती निरगुडकर आणि प्रा. पुष्पा भावे हे सत्राध्यक्ष म्हणून उपस्थित होते. आधुनिकतावाद, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, समकालीन भारतीय साहित्य, समीक्षा व स्त्री वाद - परिसंवाद या शीर्षकांतर्गत संपन्न होणाऱ्या एकंदर सहा सत्रांत एकंदर १८ शोधनिबंधांचे वाचन झाले. या चर्चासत्राचे वैशिष्ट्य म्हणजे, सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेले कविसंमेलन! श्री. आलोक भट्टाचार्य यांनी संमेलनाचे सूत्रसंचालन केले. प्रा. प्रशांत मोरे, श्री. मुकेश गौतम, श्री. प्रकाश होळकर व श्री. महेश दुबे यांनी सादर केलेल्या वैचारिक - गंभीर तसेच हास्य-व्यंग्य कवितांना रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला.

५) दि. २१ जाने. रोजी 'व्याससभा' अंतर्गत संस्कृत पाठ झाला व 'Politics and Religion' या विषयावर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी चर्चा केली.

६) दि. २३ जाने. रोजी 'व्याससभा' अंतर्गत संस्कृत पाठ झाला व 'खाद्य - संस्कृती' या विषयावर प्राध्यापकांनी चर्चा केली.

७) दि. २६ जाने. रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या शाळा व महाविद्यालयांचा एकत्रित 'प्रजासत्ताक दिन - ध्वजवंदन' संस्थेचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते जोशी - बेडेकर महाविद्यालयात झाला. यानंतर N.C.C. परेड व सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

८) दि. २८ जाने. रोजी 'जोशी - बेडेकर महाविद्यालय विवेकानंद - स्टडी सर्कल' चे उद्घाटन प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांच्या हस्त झाले. योग आणि ध्यान या विषयावर विवेकानंद स्टडी सर्कलच्या कार्यकत्यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. आता दररोज महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक ध्यान करतात.

९) दि. २९ जाने. रोजी N.S.S. तर्फे 'Disaster Management' या विषयवर कार्यशाळा आयोजित

करण्यात आली. संकटसमयी इमारतीत अडकलेल्या लोकांना बाहेर कसे काढावे, याबद्दल प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.

१०) दि. ३० जाने. रोजी 'व्याससभा' अंतर्गत संस्कृत पाठ झाला. नंतर 'Obama - dawn of new era' या विषयावर प्राध्यापकांनी चर्चा केली.

११) दि. ३१ जाने. रोजी जोशी - बेडेकर फिल्म सोसायटीतर्फे 'Baran' हा चित्रपट दाखविण्यात आला.

१२) दि. २ फेब्रु. रोजी वाणिज्य विभागातर्फे 'Concept testing in Commerce - subject' या विषयावर स्पर्धा घेण्यात आली.

१३) दि. ५ फेब्रु. रोजी माहिती - तंत्रज्ञान विभागातर्फे 'Careers in IT and opportunity in IT' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले.

१४) दि. ६ फेब्रु. रोजी 'व्याससभा' अंतर्गत प्रा. जयश्री सिंह यांनी कबीराच्या निवडक दोह्यांची तोंडओळख करून दिली. त्यानंतर प्रा. दिपाली मुलमुले यांचे 'Consumer Protection Act 1986 - and its implements' या विषयावर व्याख्यान झाले.

१५) दि. ७ फेब्रु. रोजी अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे अंधश्रद्धा निर्मूलन कार्यात सहभागी झालेल्या महाविद्यालयांचा सत्कार करण्यात आला. N.S.S. तर्फे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी प्रा. पुष्पा भावे प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या होत्या.

१६) दि. १० फेब्रु. रोजी 'Research Institute of Philosophy, Dept. of Philosophy' तर्फे 'Toledo' विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. पुलिगंडला यांचे 'Consciousness, Cosmology, Science - Advaitic Interpretation' या विषयावर व्याख्यान झाले.

वृत्तसंकलन - **प्रा. डॉ. मुग्धा कुलकर्णी**

## विधी महाविद्यालय

**मराठी दिन :**

दि. २ फेब्रु. रोजी वि. प्र. मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयात 'मराठी दिवस' मोठ्या उत्साहात पार पडला. त्यानिमित्त भित्तीपत्रक स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या होत्या. भित्तीपत्रक स्पर्धेत कु. प्रियांका बने यांनी प्रथम कु. धनश्री शिंदे यांनी द्वितीय तर कु. निलेखा सुळे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. विविध कायद्यांवर आधारित असलेली ही भित्तीपत्रके कायदा साक्षरतेसाठी वापरण्यात येणार आहेत. निबंध स्पर्धेत श्री. प्रवीण दोंड यांनी प्रथम आणि कु. प्रियांका बने व श्री. किरण म्हात्रे यांना विभागून द्वितीय क्रमांक देण्यात आला. स्पर्धेसाठी जागतिक मंदी आणि भारतीय कायदे पद्धतीपुढील प्रश्न व आव्हाने आणि भारताचे सर्वोच्च न्यायालय हे विषय होते. २ फेब्रु. रोजी झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु. निलाक्षी सागवेकर यांनी प्रथम तर प्रवीण दोंड यांनी तृतीय क्रमांक पटकावला तर श्री. सचिन उपाध्ये यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. स्पर्धेसाठी आजचा युवक आणि गांधीवाद रिॲलिटी शोतील रिॲलिटी, कायद्याची साक्षरता आणि वकिलांची भूमिका हे विषय ठेवण्यात आले होते.

स्पर्धेचे परिक्षक म्हणून जोशी - बेडेकर महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक श्री. संतोष राणे आणि ज्ञानसाधना महाविद्यालयातील प्राध्यापिका सौ. रागिणी गोळे (व्यापार विषयक कायद्याच्या) यांनी मोलाचे योगदान दिले. परीक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे विशेष कौतुक केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार, समन्वयिका सौ. प्रज्ञा राजेबहादूर व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

**घटना दिवस :**

विधी महाविद्यालयात दि. २६ जानेवारी रोजी चौथा 'घटना दिवस' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त 'माहिती अधिकाराचा कायदा' या विषयावर ॲड. श्री. गणेश सोवनी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. संगणकीय कौशल्यांचा वापर करून सरांनी विविध उदाहरणांद्वारे विषय सोपा करून विद्यार्थ्यांना समजावून दिला. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व इतर प्राध्यापक उपस्थित होते. सरांची ओळख सौ. संबिता डबराल यांनी करून दिली तर प्रथम वर्ष विधिचे विद्यार्थी श्री. सुनिल देसाई यांनी आभार मानले.

✦ के. जे. सोमय्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातर्फे दिनांक ९ व १० जानेवारी रोजी ''Gender Equity at work and Home - A key to National Development'' या राष्ट्रीय परीसंवादात विधी महाविद्यालयाच्या अधिव्याख्या व प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी ''Liability of a mother for prenatal negligence to her child, A case for equal parenthood'' या विषयावर एक निबंध सादर केला.

✦ ३० जानेवारी रोजी मुंबई विद्यापीठ, Indian Council of Gandhian Studies, New Dehli आणि व्हि. के. कृष्णामेनन वाणिज्य महाविद्यालय, भांडुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी 'Revisiting Gandhiji's Life for Tips on Legal Education' या विषयावर निबंध सादर केला.

✦ के. सी. विधी महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन 'Client Counciling' स्पर्धेमध्ये कु. अदिती आठवले (प्रथम वर्ष) व श्री. विवेक जोशी (तृतीय वर्ष) हे विद्यार्थी प्रथम पारितोषिकाचे मानकरी ठरले.



**कायदा सहायता केंद्राचे उपक्रम :**

महाविद्यालयाच्या कायदा सहायता केंद्राने कायदा साक्षरता मोहिमेअंतर्गत मुंबई विद्यापीठातर्फे दि. ४ ते २१ डिसे. रोजी प्राध्यापकांसाठी आयोजित केलेल्या अभ्यासवर्गात काही महत्त्वाचे कायदे, जसे माहितीचा अधिकार, मानवी हक्क, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान निषेध, स्त्रियांसाठीचा राष्ट्रीय आयोग या विषयांवर माहिती संकलित करून सहभागी प्राध्यापकांना देण्यात आली.

**कायदा साक्षरता शिबिर :**

दि. २५ जाने. रोजी विधी महाविद्यालयातंर्गत कार्यरत असलेला कायदा सहायता कक्ष आणि श्री सत्य साई सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गांडुळवाड जि. ठाणे ता. शहापूर येथील आश्रमशाळेत मोफत कायदा साक्षरता आणि सहायता व वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त आसपासच्या परिसरातील चार आदिवासी वस्त्यांमधील रहिवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार, कायदा सहायता कक्षाच्या प्रमुख, प्राध्यापिका सौ. रश्मी आचार्य आणि महाविद्यालयातील प्रवीण दोंड, विवेक जोशी, प्रियांका बने, सुवर्णा पाटील, संदीप कांबळे, मनोज अहिर सहभागी झाले होते.

त्याअंतर्गत गावातील लोकांची वैद्यकीय तपासणी करून त्याद्वारे योग्य तो सल्ला व औषधे पुरविली गेली. त्याबरोबरच त्यांच्या कायदेविषयक समस्यांवर इलाज करण्यासाठी आणि त्यांना कायदा साक्षर करण्यासाठी त्यांच्या दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणारे कायदे जसे मोफत कायदा सहायता कायदा, महिला संरक्षणासाठी असलेले कायदे तसेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची माहिती देखील ग्रामस्थांना देण्यात आली. त्याबरोबरच मुलांच्या आणि मुलींच्या देखील शिक्षणाचे महत्त्व त्यांना पथनाट्याद्वारे समजावून देण्यात आले.

ग्रामस्थांनी या दोन्ही उपक्रमांचे उत्साहाने स्वागत केले.

**अभिनंदन :**

श्री. काशिनाथ पद्माकर फडके, हे विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयातून ग्रंथालय परिचर म्हणून दि. ३० नोव्हें. रोजी निवृत्त झाले. त्यांनी १९७६ ते २००८ म्हणजेच जवळ जवळ ३२ वर्ष महाविद्यालयात सेवा केली. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा!



महाविद्यालयातील तृतीय वर्ष, विद्यार्थी श्री. अजय ठाकूर यांना मुंबई विद्यापीठातर्फे मे २००८ मध्ये घेण्यात आलेल्या (सत्र VI) या परीक्षेत मागासवर्गीयातून प्रथम येण्याचा मान मिळाला आहे. त्यांना मुंबई विद्यापीठातर्फे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' जन्मशताब्दी सन्मान रु. २१२५/-बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. या परीक्षेत त्यांना ५२८/८०० गुण प्राप्त झाले. महाविद्यालयातर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!




विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यातील प्राध्यापिका सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी इन्सिट्यूट ऑफ मेडिसिन ॲण्ड लॉ यांच्यातर्फे घेण्यात आलेला सर्टिफिकेट कोर्स इन मेडिकल लॉज फॉर लॉ प्रोफेशनलस् (Certificate course in Medical laws for law Professionals) यशस्वीरित्या पूर्ण केला. महाविद्यालयातर्फे त्यांचे अभिनंदन!



## वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन

**श्रीयुत हेमंत पुराणिक सेवानिवृत्त :**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे मधील श्री. हेमंत दतात्रय पुराणिक हे तंत्रनिकेतनच्या ऑफिसमध्ये दि. ५ नोव्हेंबर १९८४ पासून कार्यरत होते. ते दि. ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त झाले. तंत्रनिकेतनतर्फे प्राचार्य दि. कृ. नायक याचे हस्ते त्यांचा भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन दि. २६ डिसेंबर रोजी सत्कार करण्यात आला. तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडूनही श्री. पुराणिक यांचा सत्कार दि. ३१ डिसेंबर रोजी श्री. जी. व्ही. धुमाळ याचे हस्ते भेटवस्तू, शाळ व श्रीफळ देऊन करण्यात आला. त्याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**श्रीयुत हेमंत दत्तात्रय पुराणिक**

त्यांच्याविषयीची मनोगते अनेकांनी वक्त केली.

मा. प्राचार्य दि. कृ. नायक यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल शिक्षकेतर कर्मचारी यांचेतर्फे श्री. हेमंत पुराणिक यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**तंत्रनिकेतन वार्ता**

**२००८ ०९ या वर्षीचा वार्षिकोत्सव कार्यक्रम संपन्न - अहवाल :**

दिवाळी, परिक्षा संपली की वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे च्या वार्षिकोत्सव Poly - spark - च्या कार्यक्रमाची तयारी सुरू होते. यावर्षीही Poly spark - 2008 ची सुरुवात २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर या दरम्यान करण्यात आली.

Poly - spark च्या कार्यक्रमाचा उद्देश हा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला व त्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा व त्यासाठी व्यासपीठ मिळवून देण्याचा छोटासा प्रयत्न असतो. त्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

त्यासाठी सांस्कृतिक कमिटीची मिटींग २२ डिसेंबर ला घेण्यात आली. विविध कार्यक्रम व त्यांचे प्रमुख निवडण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमांचे जनरल सेक्रेटरी म्हणून SYIE च्या विद्यार्थी मिहीर देवधर यांची निवड करण्यात आली व सह सेक्रेटरी म्हणून SYCO च्या विद्यार्थी श्रेयस देशपांडे याची निवड करण्यात आली.

दि. २५ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यादिवशी सकाळी 'Friendship Day' आणि 'Chocolate Day' चे आयोजन करण्यात आले. दुपारनंतर रांगोळी, मेहंदी आणि टी शर्ट स्पर्धा घेण्यात आली.

दि. २६ डिसेंबर २००८ रोजी 'Traditional Day'



**सांस्कृतिक कार्यक्रमातील एक नृत्य अविष्कार**

साजरा करण्यात आला. फिल्मी गाण्यावर आधारित 'अंताक्षरी' स्पर्धा पार पडली. अंताक्षरी कार्यक्रमात उपस्थितांचा चांगलाच प्रतिसाद लाभला. त्यानंतर दुपारच्या वेळेस Fun - Fair चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थाचे व गेमचे स्टॉल्स लावले होते.

दि. २९ डिसेंबर रोजी Mr. आणि Miss Poly-spark ची निवड Tieking आणि Saree Queen स्पर्धेमधून निवडण्यात आली. त्यानंतर 'संगीत - संध्या' हा संगीतावर आधारीत गायनाची स्पर्धा पार पडली. हा कार्यक्रम थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पार पडला.



**सांस्कृतिक कार्यक्रमात उपस्थित असलेले शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी समुदाय. (कार्यक्रमाचा अस्वाद घेत असताना)**

दि. ३० डिसेंबर २००८ या दिवशी 'Talent Hunt' स्पर्धा पार पडली. ही स्पर्धा Instrumental आणि One Act Ploy या दोन विभागात विभागली होती. त्यानंतर 'नृत्य स्पर्धा' घेण्यात आली.

सर्वात जास्त event मध्ये सहभाग असलेल्या व चांगला performance देण्यात विभागातील विद्यार्थ्यांना 'चॅम्पियन ट्राफी' ही इर्न्फेमेशन टेनॉलॉजी (IF) या विभागाकडे गेली व रनर अप म्हणून इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनीक्स (IE) विभाग होता.

२००८-०९ चे वार्षिक स्नेहसंमेलन हे प्रा. ऋुचा कोऱ्हाळे यांच्या नेतृत्वाखाली व प्राचार्य दि. कृ. नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक समितीचे प्रमुख व विद्यार्थी प्रतिनिधी इत्यादीचे सहकार्य लाभले. या सर्वांचे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रमुख प्रा. ऋुचा कोऱ्हाळे यांनी आभार मानले.

वृत्तसंकलन **चंद्रकांत शिंगडे**
वि. प्र. म. चे तंत्रनिकेतन, ठाणे

●●●

**मुखपृष्ठावरून**
**संपादकीय**
**माहिती उपलब्धतेच्या दिशेने**

माहिती उपलब्ध होणे हे ही महत्त्वाचे ठरते.

ग्रंथालयाच्या इतिहासात ग्रंथांपर्यंत पोहोचण्यात तालिका हा महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे. आज ग्रंथसंपदेपर्यंत पोहचण्यात असणारी वेळेची अडचण ही तालिकेवर असणारी मर्यादा संगणकाधारित तालिकेमुळे दूर झाली आहे. आचार्य अत्रे यांच्या एखाद्या पुस्तकाचा संदर्भ शोधायचा असेल तर ते पुस्तक कोणत्या ग्रंथालयात आहे, त्याचा क्रमांक, उपलब्धता काय आहे ही व या प्रकारची कोणतीही माहिती संगणकाच्या कळफलकाचा वापर करून उपलब्ध करून घेण्याची सोय होऊ शकते.


कोकण विभागातील ग्रंथालयांची अशी संयुक्त तलिका निर्माण करून सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे निर्माण करण्याचा विद्या प्रसारक मंडळाचा प्रकल्प म्हणूनच अतिशय महत्त्वाचा आहे. देवनागरीत अशा प्रकारचा हा पहिला उपक्रम आहे. देवनागरी लिपी विश्वसूत्रात (युनिकोड) उपलब्ध नसणे ही यातील प्रमुख अडचण. काही व्यापारी संकेतस्थळांवर देवनागरीत मजकूर असला तरी वळण शैलीच्या (फॉन्ट) वैशिष्ट्यामुळे दुसऱ्या संगणकावर तो दिसत नाही. विश्वसूत्रामुळे संगणक चलित असणारा कोणताही बुदिभाग (सॉफ्टवेअर) वाचता येतो. त्याला वळणशैलींची अडचण येत नाही. सूत्र एकच असल्याने टंकलिखित स्वरूपातील कोणताही मजकूर कोणत्याही संगणकावर दिसू शकतो. दुर्दैवाने इतर भाषांकरता व विशेषत: भारतीय भाषांकरता हे होत नव्हते. तुमच्या संगणकाच्या यंत्रभागाशी (हार्डवेअर) व बुद्धिभागाशी मिळते जुळते सूत्र आवश्यक होते.

कै. रा. कृ. जोशी यांनी अक्षरांचा, लिपीचा अभ्यास करण्यासाठी, यासंबंधात प्रयोग करत राहण्यासाठी आयुष्य वेचले. त्यांच्या प्रेरणेतूनच अनंत कार्पोरेशनचे श्री. कौस्तुभ काळे यांनी अविरत मेहनत घेतली. या तांत्रिक समस्येची सोडवणूक विद्या प्रसारक मंडळाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील अभ्यासकांनी करायचा प्रयत्न केला आणि या सर्वांचे फळ म्हणजे 'ग्रंथालय डॉट ओआरजी' हे संकेतस्थळ होय. विद्या प्रसारक मंडळाने विद्येचा प्रसार करत राहण्याचा आपला अस्तित्व हेतू पूर्ण करत हे संकेतस्थळ तयार केले. कला वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. नारायण बारसे व व्यवस्थापन विभागाचे ग्रंथपाल श्री. संदीप भावसार यांनीही यासाठी अथक प्रयत्न केले. सार्वजनिक ग्रंथालयांनी त्यांच्याकडून आवश्यक असणाऱ्या सहभागाचा वाटा उचलावयास हवा. असे झाले सार्वजनिक ग्रंथालयांतील माहितीच्या उपलब्धनेचा महामार्ग निर्माण होऊ शकेल.

एखाद्या महान माणसाची मते अमान्य असू शकतात, पण त्याची महानता नव्हे.

## विपत्तीमध्ये तू माझं रक्षण करक

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंसं, मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरुन जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा.



**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*
*अशा सुविधांनी युक्त*

| **सभागृहाचे नांव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना.बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

### ☆ संपर्क ☆

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.